पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक
# सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १९७ ■ शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६
RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com





## महापौर पदाच्या निवडणुकीपुर्वीच.....

# सत्ता स्थापनेचा पेच कायम.....!

## ⏩ यशवंत भवन होते आजचे महत्वाचे पॉलिटिकल हब

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोला:** अकोला महानगरपालिकेच्या सत्तास्थापनेचा पेच आता टोकाला पोहोचला असून शहरात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. वंचित नेते प्रकाश आंबेडकर यांचे यशवंत भवन हे गुरुवार आणि शुक्रवारी पॉलिटिकल हब झाले होते. अकोला महापालिकेत कोणालाही स्पष्ट बहुमत नसल्याने 'किंगमेकर'च्या भूमिकेत असलेल्या अपक्ष आणि लहान पक्षांच्या हालचाली वाढल्या आहेत. एका बाजूला भाजपने ४५ नगरसेवकांचा पाठिंबा असल्याचा दावा केला असतानाच, दुसरीकडे काँग्रेस, शिवसेना (उद्धव गट), वंचित बहुजन आघाडी, एमआयएम आणि राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांनी भाजपला रोखण्यासाठी कंबर कसल्याचे चित्र होते. गुरुवारी प्रकाश आंबेडकर यांच्या घरी सर्वच नेत्यांनी आज जोरदार चर्चा केल्याची माहिती आहे. काँग्रेस आमदार साजीद खान पठाण यांनी आंबेडकर यांची भेट घेत सत्ता स्थापनेची काँग्रेसची तयारी स्पष्ट केली. इतकेच नाही तर काँग्रेसला कुठले ही पद नको असे ही पठाण म्हणाले. आज ही सकाळी आंबेडकर यांच्या बंगल्यावर अनेक बडे नेते उपस्थित होते.



### वंचित सोडेल काय महापौर पद

शिवसेना आणि वंचित यांच्यामध्ये महापौर पदावरुन जोरदार रणकंदन सुरु आहे. यात वंचित महापौर पद सोडून स्थायी समिती चे सभापती पद घेईल काय या विषयावर जोरदार खलबत सुरु होती. दरम्यान, शिवसेनेने महापौर पदावर दाव करत मंगेश काळे यांच्या पत्नी सुरेखा काळे यांचे नाव शिवसेनेतून आघाडीवर आहे. त्याच बरोबर वंचित कडून जयश्री बहादूरकर यांचे देखील नाव समोर येत असून वंचित आणि शिवसेनेत या विषयावर तोडगा निघाला तर भाजप शिवाय सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग येऊ शकतो. दरम्यान, भाजप नेत्यांनी देखील नगरसेवकांची जमवाजमव सुरु केली असून राष्ट्रवादी काँग्रेस भाजप सोबत जाते काय हे पाहण्यसारखे असेल.







### आशिष पवित्रकार कोणासोबत

गुरुवारी ज्या वेळी भाजपच्या सर्व नगरसेवक व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक सुरु होती. अगदी त्याच वेळी भाजपने तिकिट नाकारलेले व दणदणित विजय मिळविलेले अपक्ष नगरसेवक आशिष पवित्रकार हे आंबेडकरांच्या बंगल्यावर प्रकाश आंबेडकर यांच्याशी हितगुज करत होते. वंचित गटनेता निलेश देव यांनी त्यांच्या राजकारण बाहेरील मैत्रीचा फायदा घेत आशिष पवित्रकार यांना प्रकाश आंबेडकर यांच्या बंगल्यावर आंबेडकरांच्या सांगण्यावरुन आमंत्रित केले. अकोल्यातील सत्ता स्थापनेच्या संपूर्ण नाट्यात भाजपचे माजी गृहराज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील यांचे पुतण्या आणि भाजपचे बंडखोर अपक्ष नगरसेवक आशिष पवित्रकार यांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. गुरुवारी पवित्रकार यांनी थेट प्रकाश आंबेडकर यांच्या निवासस्थानी जाऊन २० मिनिटे चर्चा केल्याने राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. 'मी माझी भूमिका स्पष्ट केली आहे,' असे सूचक विधान पवित्रकार यांनी बैठकीनंतर केले. आशिष पवित्रकार हे नेमके कुठे जाणार असा प्रश्न असताना भाजपने मात्र त्यांना बोलाविले नसल्याचे पवित्रकार यांनी स्पष्ट केले. पण, वेळेवर पवित्रकार यांचा काय पवित्रा राहतो हे पाहण्यासारखे असेल.

### महापौर निवडणुकीच्या कार्यक्रमाच्या घोषणेची वाट

महापालिकेत कोणाची सत्ता होणार, या विषयावर अकोलेकरांमध्ये कमालीची उत्सुकता आहे. इतकेच नाही तर प्रत्येक व्यक्ती या विषयावर चर्चा करताना दिसतो. भाजप कि महाविकास आघाडी असा प्रश्न अकोलेकरांना पडला आहे. जनतेने कोणाला नाकारले आणि कोणाची सत्ता होणार यावर मंथन होताना दिसत आहे. भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी महाआघाडीच्या दोन आमदारांनी तगडी फिल्डिंग लावली आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीत एमआयएम, काँग्रेस, शरद पवार गट आणि अजित पवार गटाच्या नेत्यांची संयुक्त बैठक गुरुवारी सकाळी आणि रात्री पार पडली. भाजपच्या वतीने रश्मी अवचार, प्राची काकड, शारदा खेडकर यांच्या नावाची चर्चा आहे. तर उध्दव ठाकरे यांच्या गटाकडून सुरेखा मंगेश काळे यांच्या नावाची चर्चा आहे. तर वंचित कडून जयश्री बहादूरकर यांच्या नावाची चर्चा रंगली होती. केवळ महापौरच नाही, तर उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेते आणि विषय समिती सभापती पदांसाठीही जोरदार लॉबिंग सुरू आहे. महापौर निवडणुकीचा कार्यक्रम विभागीय आयुक्त कधी घोषित करतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. अमरावती विभागीय कार्यालयात आज सकाळी एमआयएम आणि शिवसेना (उबाठा) यांच्या गटाची स्वतंत्र नोंदणी झाली.

## दावोस दौरा म्हणजे 30 लाख कोटींचा जुगार

### प्रकाश आंबेडकरांची बोचरी टीका


प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोला:** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वित्झर्लंडमधील दावोस दौऱ्यावरून आणि तिथे होणाऱ्या गुंतवणुकीच्या करारांवरून वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी सडकून टीका केली आहे. फडणवीस दावोसला गुंतवणूक आणायला जातात की 'मटका' खेळायला, असा बोचरा सवाल करत त्यांनी सरकारच्या दाव्यांची चिरफाड केली.

माध्यमांशी बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, देवेंद्र फडणवीस प्रत्येक वेळी दावोसला 'मटका' खेळण्यासाठी जातात. यावेळी त्यांचा हा 'मटका' ३० लाख कोटींचा झाला असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, ही गुंतवणूक केवळ कागदावर आहे की प्रत्यक्षात, असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

'जर १ लाख कोटींच्या वर गुंतवणूक आली असेल, तर ती राज्यातील जिल्ह्या-जिल्ह्यांमध्ये कारखान्यांच्या आणि विकासाच्या रूपाने नेमकी कुठे विभागली गेली, याचे विवरण सरकारने द्यायला हवे,' अशी मागणी आंबेडकरांनी केली. जर राज्याचा विकास झाला तर फडणवीस 'मटका' जिंकले आणि जर विकास दिसला नाही तर ते 'हारले', असे समजावे, असा टोलाही त्यांनी लगावला. यावेळी प्रकाश आंबेडकरांनी आगामी राजकीय समीकरणांवरही भाष्य केले. महापौर पदाच्या उमेदवारीबाबत झालेली चर्चा सकारात्मक असून, वंचित बहुजन आघाडी लवकरच आपला उमेदवार जाहीर करेल, असे त्यांनी स्पष्ट केले.

## चाळीस आतील भाजपची सत्ता होईल पण.....



प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोला:** मुख्यमंत्र्यांच्या सभेत साठ पारचा नारा देणाऱ्या भाजपला अकोल्यात २०१७ च्या निवडणुकीतील ४८ हा नगरसेवकाचा आकडा गाठता आला नाही. भाजप ४० च्या आत गेल्याने मोठी नामुष्की झाली आहे. अकोल्यात भाजपची सत्ता होते की भाजप प्रणित गटाची याची चर्चा रंगली आहे.

देशात, राज्यात भाजपची सत्ता आहे. तशी ती अकोल्यात होईल काय असा प्रश्न विचारला जात आहे. पण, अकोल्यात भाजपची नाही तर भाजप प्रणित गटाची सत्ता स्थापन होण्याच्या हालचाली वेगाने घडत आहे. जिल्ह्यात खासदार, बहुसंख्य आमदार भाजपचे असताना अकोला महापालिकेत भाजपची नाही तर भाजप प्रणित गटाची सत्ता स्थापन होण्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. तिकिट वाटपातील घोळाने भाजपला फटका बसल्याचे खाजगीत नेते मान्य करत आहे. इतकेच नाही तर स्वपक्षीय बड्या नेत्यांनी काही तरुण उमेदवारांना पाडल्याचा दावा होत आहे. तिकिट वाटपातील रडारडी नंतर भाजपला पुर्ण बहुमत अकोलेकरांना नाकारले. याला जबाबदार कोण अशी विचारणा होत आहे. भाजपची सत्ता स्थापन होते की भाजप प्रणित गटाची हा विषय अकोल्यात नाही तर राज्यात चर्चेचा विषय ठरला आहे.

## मध्यमवर्गीयांना बसणार विजेचा शॉक! बिलात होणार वाढ, सरकारचा निर्णय

प्रतिनिधी २३ जानेवारी

**मुंबई:** येणारा काळ देशभरातील लाखो वीज ग्राहकांसाठी महागडा ठरू शकतो. केंद्र सरकारच्या २०२६ मसुद्यामुळे वीज दरांवर मोठा वाद निर्माण झाला आहे. जर ते लागू केले गेले तर २०२६-२७ पासून वीज बिलांमध्ये दरवर्षी आपोआप वाढ होऊ शकते.

आतापर्यंत राजकीय कारणांमुळे अनेक राज्यांमध्ये दीर्घकाळ वीज दर वाढवले जात नव्हते, परंतु नवीन धोरण ही प्रणाली बदलण्यासाठी सज्ज आहे. यामुळे मध्यमवर्गीयांना महागाईची झळ येणाऱ्या काळात खूप बसणार आहे असं दिसत आहे. सरकारने जारी केलेल्या मसुद्यात इंडेक्स-लिंक्ड टॅरिफ प्रणाली सुचवण्यात आली आहे. या अंतर्गत, जर राज्य नियामक आयोग वेळेवर वीज दर निश्चित करण्यात अयशस्वी ठरले तर वीज दर एका निश्चित सूत्रानुसार आपोआप वाढतील. याचा अर्थ असा की दर वाढवण्याचा किंवा न वाढवण्याचा निर्णय आता पूर्णपणे राजकीय राहणार नाही. वीज वितरण कंपन्यांची (डिस्कॉम) आर्थिक स्थिती सतत खालावत आहे. या कंपन्यांकडे देशभरात अंदाजे ३ लाख कोटींची रुपयांची थकबाकी आहे. सरकारी आकडेवारीनुसार, २०२३ या आर्थिक वर्षात वीज कंपन्यांना प्रति युनिट सरासरी ५० पैशांचा तोटा सहन करावा लागला. खर्चाच्या तुलनेत कमी वसुली हे या संकटाचे एक प्रमुख कारण आहे. विद्युत (सुधारणा) विधेयकाचा मसुदा संसदेच्या आगामी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर केला जाऊ शकतो हे उल्लेखनीय आहे.

## फरार विकास गोगावले अखेर पोलिसांसमोर हजर!

प्रतिनिधी २३ जानेवारी

**महाड :** महाड नगर पालिका निवडणुकीदरम्यान झालेल्या राडा प्रकरणामुळे चर्चेत असलेले आमदार भरत गोगावले यांचे चिरंजीव विकास गोगावले अखेर पोलिसांना शरण आले आहेत. मागील दीड महिन्यांपासून फरार असलेले विकास गोगावले आज महाड शहर पोलीस ठाण्यात स्वत:हून हजर झाले. न्यायालयाच्या कडक आदेशानंतर त्यांनी हे पाऊल उचलले आहे.

महाड नगर पालिका निवडणुकीच्या प्रचारादरम्यान दोन राजकीय गटांत मोठा राडा झाला होता. या हिंसाचार आणि राडा प्रकरणात विकास गोगावले यांच्यावर गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले होते. या प्रकरणाचा तपास सुरू झाल्यापासून विकास गोगावले अटकेच्या भीतीने फरार होते. पोलिसांनी त्यांचा शोध घेण्यासाठी विविध ठिकाणी छापेमारी केली होती, मात्र ते सापडले नव्हते. विकास गोगावले यांनी अटकेपासून संरक्षण मिळवण्यासाठी न्यायालयात धाव घेतली होती.

## ठाकरे गटाचे एकाचवेळी ४ उमेदवारांचे अर्ज बाद!

**सोलापूर :** सोलापूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला अक्कलकोट तालुक्यात मोठा राजकीय धक्का बसला आहे. छाननी प्रक्रियेदरम्यान ठाकरे गटाच्या तीन जिल्हा परिषद उमेदवार आणि एक पंचायत समिती उमेदवाराचा अर्ज तांत्रिक कारणांमुळे बाद ठरवण्यात आला आहे. या निर्णयामुळे तालुक्यातील राजकीय समीकरणे बदलली असून ठाकरे गटाच्या निवडणूक रणनीतीला खिंडार पडले आहे.

# अकोला महानगरपालिका महापौर पदाची भाजपाला पाच वेळा संधी!

### पाच वेळा महिलांना मिळाला मान, सहाव्या महापौराची उत्सुकता शिगेला

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिका अस्तित्वात आल्यानंतर पहिला महापौर होण्याचा मान भाजपच्या समुनताई गावंडे यांच्या रूपाने महिलेलाच मिळाला असून, आतापर्यंत पाच महिलांनी हे पद भूषविले आहे. आणि आता सहाव्यांदाही महिलांनाच संधी मिळणार आहे. विशेष म्हणजे आठ महापौर पदांपैकी भाजपला पाच वेळा महापौर पदाची संधी मिळाली आहे तर दोन वेळा काँग्रेस आणि एक वेळा भारिप-बहुजन महासंघाला म्हणजे वंचितला या पदाचा मान मिळाला आहे. आता नववा महापौर कोण होतो, याची उत्सुकता शहरवासीयांना लागली आहे.

महापालिका निवडणुकीनंतर महापौरपदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे. ओबीसी महिला शहराच्या प्रथम नागरिक म्हणजेच महापौर होणार आहेत. अकोला महानगरपालिकेची सत्ता बहुतांश वेळा भाजपच्या हातात राहिली आहे. अकोला हा भाजपचा गड मानला जात आहे. या गडाला काँग्रेसचे मदन भरगड आणि सुरेश पाटील यांनी शह देत महापौर होत काँग्रेसकडे सत्ता खेचून आणली होती. त्यानंतर एक वेळा ज्योत्सना गवई यांच्या रूपाने भारिप-बहुजन महासंघाकडे आताच्या वंचितने हे पद भूषविले आहे. अकोल्याच्या महापौर पदाच्या इतिहासात आतापर्यंत चार वेळा सर्वसाधारण तर चार वेळा ओबीसी प्रवर्गाचे आरक्षण निघालेले आहे. तसेच एक वेळा एससी (महिला) आरक्षण निघाले होते.




### महापौर पदाचे सर्वाधिक उमेदवार भाजपाकडे

सत्ता स्थापनेत आघाडीवर असलेल्या भाजपाकडे ओबीसी महिला प्रवर्गाचे सर्वाधिक १३ नगरसेवक आहेत. त्यामुळे या पदासाठी चढाओढ होण्याची शक्यता असून पक्षाच्या वरिष्ठांची डोकेदुखी वाढली आहे. तसेच काँग्रेसकडेही तीन ओबीसी नगरसेविका आहेत. तसेच शिवसेना ठाकरे गट, वंचित व राष्ट्रवादी अजित पवार गटाकडे देखील ओबीसी महिला नगरसेविका आहेत. सत्ता समीकरणासाठी रस्सीखेच सुरू असताना आता महापौर कुठल्या पक्षाचा आणि कोण होणार, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

### अशा आहेत ओबीसी महिला नगरसेविका

**भाजपा** - वैशाली शेळके, मंजूषा शेळके, नीतू जगताप, शिल्पा वरोरीकार, कल्पना गोटफोडे, प्राची काकड, योगिता पावसाळे, पल्लवी मोरे, रश्मी अवचार, निकिता देशमुख, शारदा खेडकर, माधुरी क्षीरसागर, सोनाली अंधारे.

**काँग्रेस** - निखत शाहीन अफसर कुरेशी, जैनब बी शेख इब्राहीम, अरशीया परविन मोहम्मद शारीक.

महापौरपदासाठी भाजपच्या

## टॉप १० महिला नगरसेविका?

**मुंबई :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीच्या निकालानंतर आता सर्वांचे लक्ष महापौरपदाच्या निवडीकडे लागले आहे. नुकतंच मुंबई महापालिकेच्या महापौर पदासाठीची आरक्षण सोडत काढण्यात आली. या आरक्षणाच्या सोडतीनुसार, मुंबईचे महापौरपद महिलांसाठी राखीव झाले आहे. या निर्णयामुळे राजकीय हालचालींना वेग आला आहे. भाजपमधील दिग्गज महिला नगरसेविकांची नावांची महापौर पदाच्या शर्यतीत पाहायला मिळत आहेत. आता याची यादीही समोर आली आहे. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, भाजप मुंबईच्या महापौरपदी एखाद्या अनुभवी मराठी महिला नगरसेविकेला संधी देण्याच्या तयारीत आहे. यामध्ये अनेकवेळा निवडून आलेल्या दिग्गज नगरसेविकांपासून ते आपल्या कार्यशैलीने प्रभाव पाडणाऱ्या तरुण चेहऱ्यांचा समावेश आहे. महायुतीच्या रणनीतीमध्ये हा चेहरा अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.




CMYK

सिटी न्यूज अमरावती
शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# ग्रंथभेट योजनेसाठी प्रकाशित ग्रंथ सादर करण्याचे आवाहन

**अमरावती:** राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान अंतर्गत ५२ व्या ग्रंथभेट योजना राबविण्यात येणार आहे. यासाठी सन - २०२५ या कॅलेंडर वर्षातील प्रकाशित ग्रंथ सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठान, कोलकाता व राज्य शासन यांच्या वतीने समान निधी 'ग्रंथभेट' योजनेंतर्गत सन २०२५ या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेली मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेतील ग्रंथ खरेदी करुन राज्यातील शासनमान्य ग्रंथालयांना भेट म्हणून देण्यात येतात. या योजनेअंतर्गत खरेदी करण्यात येणाऱ्या ग्रंथांची निवड करणे, तसेच ग्रंथालय संचालनालय स्तरावरुन प्रसिद्ध होणाऱ्या 'शासनमान्य ग्रंथ निवडयादी' मध्ये समावेश होण्यासाठी सन २०२५ या कॅलेंडर वर्षात प्रकाशित झालेल्या व प्रथम आवृत्ती असलेल्या ग्रंथांची प्रत्येकी एक विनामुल्य प्रत ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे दि. २८ फेब्रुवारी, २०२६ पर्यंत सादर करावी लागणार आहे.

# अमरावती महापालिकेवर 'सर्वसाधारण राज; महापौरपदाचा कुणाच्या डोक्यावर ताज?

## ◆ सत्तास्थापनेसाठी हवा ४४ आकडा बसपच्या तीन नगरसेवकांची भूमिका ठरणार महत्त्वपूर्ण

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अमरावती :** अमरावती महापालिकेच्या महापौर पदासाठी गुरुवारी आरक्षण सोडत काढण्यात आली. महापौरपद हे सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव निघाले असून, १७ व्या महापौर पदासाठी मोठी स्पर्धा होईल, असे चित्र आहे. संख्याबळानुसार भाजप महापौर पदासाठी दावा करणार असला तरी बसपच्या तीन नगरसेवकांची भूमिका महत्त्वपूर्ण ठरणारी आहे. तर, भाजपमध्ये महापौर पदासाठी अनेक दावेदार असल्याचे वास्तव आहे.

महापालिका निवडणुकीचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहीर झाल्यानंतर एकाही राजकीय पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही. सत्तास्थापनेसाठी ४४ ही आकडेवारी जुळविण्यासाठी आता नेत्यांची दमछाक होत आहे. पद आणि अन्य मागण्या पूर्ण कशा कराव्या यातच चर्चेच्या आटोपत असून, ठोस निर्णय अद्यापही झालेला नाही.

**'मॅजिक' फिगरची जुळवाजुळव सुरू**

गुरूवारी महापौरपद सर्वसाधारण प्रवर्गासाठी आरक्षित जाहीर झाल्यामुळे अनेक इच्छुकांच्या आकांक्षा बळावल्या आहेत. ४४ हा मॅजिक फिगर' कसा जुळवता येईल, यासंदर्भात जोर बैठकांचे सत्र वाढले आहे.

**भाजपत महापौर पदासाठी दावेदारांची रांग**

**- अमरावती महापालिकेचे नवे महापौरपद हे सर्वसाधारण**

प्रवर्गासाठी राखीव निघाल्याने भाजपत नवीन, जुन्या चेहऱ्यांना महापौर पदाचे वेध लागले आहे. यात महिला व पुरुष नगरसेवकदेखील आघाडीवर आहेत.

भाजप महापौर पदासाठी कुणाचे नाव निश्चित करतो, यावरही बरेच काही अवलंबून आहे. आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाचीसुद्धा तितकीच भूमिका महत्त्वाची ठरणारी आहे.

किंबहुना कोणता पक्ष कोणाशी आघाडी, युती करणार यावरच महापौर पदाचे गणित जुळणार आहे. भाजपत स्मिता सूर्यवंशी, सुरेखा लुंगारे, लविना हर्षे, ऋषिकेश देशमुख, राधा कुरील, मिलिंद बांबल, स्वाती कुळकर्णी, पद्मजा कौंडण्य, चेतन गावंडे, नूतन भुजाडे आदींची नावे चर्चेत आहेत.

### काँग्रेसही महापौर पदाच्या शर्यतीत

काँग्रेसकडे १५ एवढे संख्याबळ आहे. मात्र राष्ट्रवादी (अजित पवार) ११, एमआयएम १२, वंचित १, उद्धवसेना २, बसप ३ अशी राजकीय पक्षांची मोट बांधून विकासाच्या नावे एकवटण्याची तयारी चालविली आहे. अशी आघाडी झाल्यास महापौर पदासह अन्य पदे काबीज करता येईल, अशी नवीन घडामोड उदयास येण्याची शक्यता आहे. काँग्रेसचे विलास इंगोले हे महापौर पदाचे प्रमुख दावेदार मानले जात आहेत.

दुसरीकडे आमदार संजय खोडके आणि आमदार रवी राणा यांच्यात राजकीयदृष्ट्या फारसे जमत नाही. त्यामुळे राष्ट्रवादी (अजित पवार) गट कोणाच्या बाजूने उभा राहतो, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. भाजप २५, युवा स्वाभिमान पक्ष १५ आणि शिंदेसेना ३ असे युतीचे ४३ संख्याबळ आहे. महापौर पदासाठी ४४ एवढे संख्याबळ हवे.

# दोन दुचाकी चोरट्यास दोन दुचाकीसह अटक

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अमरावती :** अमरावती गुन्हे शाखा ने दोन दुचाकी चोरांस अटक केली आहे. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी आयुक्तालय हददीतील दुचाकी चोरीचे गुन्हे उघडकिस आणणेबाबत आदेशीत केल्यावरुन गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांचे नेतृत्वात पथकातील पोलिस अधिकारी व अंमलदार यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.

पोलीस स्टेशन वलगाव अप. कं. ३३५/२०२५ कलम ३०३(२)भा. न्या. सं. अन्वये दुचाकी चोरी चा गुन्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा संमातर तपास गुन्हे शाखेचे पथक करीत असतांना २२/०१/२०२६ रोजी गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहिती मिळाली की एक इसम हा चांदुररेल्वे रोडवर, वुडस वाटरपार्क च्या पुढील टर्निंग पॉइटवर चोरीची गाडी घेवुन उभा आहे. यावरुन आरोपी नामे आशिष देवेन्द्र मकेश्वर, वय ३५ वर्ष, रा. मिलींद नगर, चादुर रेल्वे, जि. अमरावती यास ताब्यात घेवुन विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने कबुली दिली की त्याने ती डीम युगा मोटारसायकल अंदाजे बरेच दिवसापुर्वी वलगाव ते अचलपुर रोडवरील शेतातुन चोरून नेली होती असे त्याने सांगीतले वरुन त्याचे ताब्यातुन एक काळया रंगाची होंडा कंपनीची डीम युगा मोटारसायकल विना नबंर प्लेटची जप्त करून मोटारसायकल चोरीबाबत पोलीस स्टेशन वलगाव अप.कं. ३३५/२०२५ कलम ३०३ (२) भा.न्या.सं. प्रमाणे दाखल असलेला गुन्हा उघडकिस आणला व पुढील कायदेशीर कार्यवाही करीता आरोपीस पोस्टे वलगाव यांच्या ताब्यात देण्यात आले. तसेच पोलीस स्टेशन फ्रेजरपुरा अप. कं. ५२/२०२६ कलम ३०५ (ब) भा. न्या.सं. अन्वये दुचाकी चोरी चा गून्हा दाखल असुन सदर गुन्हयाचा संमातर तपास गुन्हे शाखेचे पथक करीत असतांना आज दिनांक २२/०१/२०२६ रोजी गुन्हे शाखेच्या पथकास गोपनीय माहीती मिळाली की एक इसम हा मालटेकडी जवळ एक इसम हा चोरीची गाडी घेवुन उभा आहे. यावरुन आरोपी नामे छगन राहुल पांडे, वय ३५ वर्ष, रा. महाकाली मटन सेंटरजवळ, यशोदानगर नं १, ता, जि. अमरावती यास ताब्यात घेवुन सखोल विचारपुस केली असता त्याने कबुली दिली की त्याने ती ॲक्टीव्हा मोटारसायकल .२०.०१.२०२६ रोजी काँग्रेसनगर रोडवर असलेल्या घरातुन चोरुन नेली होती असे सांगीतले वरुन त्याचे ताब्यातुन एक पांढ-या रंगाची Mh27BM8930 नंबरची थी जी ॲक्टीवा कंपनीची मोटरसायकल जप्त करून पोलीस स्टेशन फेजरपुरा अप. कं. ५२/२०२६ कलम ३०५ (ब) भा. न्या.सं. प्रमाणे दाखल असलेला मोटर सायकल चोरीचा गुन्हा उघडकिस आणला व पुढील कायदेशीर कार्यवाही करीता आरोपीस पोस्टे फेजरपुरा यांच्या ताब्यात देण्यात आले.

# संस्कृती संवर्धनाची १५ सुवर्ण वर्षे: विश्वमांगल्य सभेचा दैदिप्यमान प्रवास

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अमरावती :** श्रीनाथपीठाधीश्वर अनंतविभुषित १००८ प.पु. श्री. जितेंद्रनाथ महाराज, श्री देवनाथ मठ अंजनीग्राम यांच्या दूरदर्शी, दिशादर्शक प्रेरणेतून, माघ शुद्ध ४ शके १९३१, दिनांक १९ जानेवारी २०१० रोजी 'विश्वमांगल्य सभा' या तेजस्वी कार्याची स्थापना झाली. संत व देव घरोघर जाऊ शकत नाही. तथापी समृद्ध, श्रीमंत विचारांचा समाज निर्माण करणे ही सृजनशीलता शक्तीस्वरुपी मातेकडून शक्य आहे. म्हणुन ''उंबरठ्याच्या आतील घर'' हे कार्यक्षेत्र निश्चीत करत घराघरात सुसंस्कारीत, घरदांज, राष्ट्र व धर्माप्रती नितांत श्रध्दा असलेल्या तेजस्वी माता निर्माण करणे या उद्देशाकडे विश्वमांगल्य सभेची वाटचाल सुरू झाली. सर्वमान्य अशा शक्तीशाली मातांचा येसुबाई, जिजाऊ, लक्ष्मीबाई, दुर्गावती, अहिल्येचा आम्हाला वारसा लाभलेला आहे. श्रद्धा, निष्ठा, आत्मविश्वासाची पिढी घडवणे ही या काळाची गरज पूर्ण करण्याचे कार्य ती करत असल्यामुळेच 'न मातु: पर दैवतम् हे पूजनीय'.

प.पूज्य श्री गुरुजींच्या दैवी प्रेरणेतून गुरुकुल पद्धतीने वेदशास्त्र शाळा सुरू आहेत. तसेच जीवनाचा त्याग करून १५ पेक्षा अधिक उच्च विद्याविभूषीत युवती पूर्णकालीन प्रचारिका केवळ देशातच नव्हे तर परदेशात देखील सभेच्या कार्याची धुरा अत्यंत सक्षमपणे सांभाळत आहेत. समाजऋण, मातृभूमीच्या ऋणासाठी वाहून घेणारी सभा जी संस्कार, सामर्थ्य, सदाचार व सेवा अशा चार ध्येयस्तंभावर भक्कमपणे दिमाखात उभी आहे.

या सभेद्वारे प्रथमतः संस्कृत ज्ञान सभा-विद्वानांद्वारे सखोल मार्गदर्शन, संस्कार संवर्धने व विविध प्रसंगांचे आयोजन करणे, जीवननिष्ठ शिक्षण-हे कष्टांचे काम नसून ही एक ईश्वरीय उपासना समजून त्याद्वारे समाज जीवन बांधिलकी करणे, भारतीय संस्कृती संरक्षा-भारताच्या गौरवशाली इतिहास, परंपरा व समृद्ध संस्कृतीचे संवर्धन करणे तसेच प्रेरणा प्रसार-इतिहासातून प्रेरणा घेऊन, ऐतिहासीक चारित्र्य निर्माणाचे कार्य करणे हे उपक्रम राबविण्यात आले. ज्यावेळी संपुर्ण देश हे कोरोना विषाणुने ग्रस्त होते, अशा वेळेत सुध्दा परिस्थिती अनुरूप का होईना संघटनेचे सुत्र प्रवास, संपर्क, बैठक हे संघटन कार्य अखंड सुरूच होते. त्यावेळी मोबाईलच्या माध्यमातुन १५ दिवसीय चरीत्रकथनमाला आयोजित करण्यात आली.

# सप्टेंबर २०२६ पर्यंत 'स्मार्ट'चे सर्व प्रकल्प पूर्ण करा - प्रकल्प संचालक एम. जे. प्रदीपचंद्रन

## ◆ विभागातील स्मार्ट प्रकल्पांचा प्रकल्प संचालकांकडून आढावा

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अमरावती:** अमरावती विभागात बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पाची अंमलबजावणी निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न सुरु आहे. स्मार्ट प्रकल्पांतर्गत असलेले सर्व प्रकल्प सप्टेंबर २०२६ अखेरपर्यंत पूर्ण करावे, असे निर्देश प्रकल्प संचालक एम. जे. प्रदीपचंद्रन (भाप्रसे) यांनी कार्यान्वयन यंत्रणांना बैठकीत दिले.

अमरावती विभागातील उपप्रकल्पांची गती वाढवण्यासाठी आणि अंमलबजावणीतील अडचणी दूर करण्यासाठी प्रकल्प संचालक श्री. प्रदीपचंद्रन यांनी येथील रामेती येथे आयोजित बैठकीत विभागाचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोडपडे, अतिरिक्त प्रकल्प संचालक उदय देशमुख, विभागाचे नोडल अधिकारी डॉ. प्रशांत नाईक यांच्यासह विभागातील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या



प्रतिनिधी तसेच कार्यान्वयन यंत्रणेचे अधिकारी आदी उपस्थित होते.

स्मार्ट प्रकल्पाचे विभागातील कामकाज, प्रकल्पांची व्याप्ती, प्रकल्पातून निर्माण झालेल्या पायाभूत सुविधा व त्यामुळे विभागातील शेतकऱ्यांना झालेला फायदा याबाबत विभागीय कृषी सहसंचालक श्री. घोरपडे यांनी प्रास्ताविकातून माहिती दिली. त्यांनी सांगितले की, विभागात एकूण ६९ गोडाऊनमध्ये १,०१,४८० मेट्रिक टन धान्य साठवणूक क्षमता स्मार्ट प्रकल्पातून निर्माण होणार असून आजपर्यंत २४ गोडाऊन पूर्ण झाले आहे. यामाध्यमातून ४७,९०० मेट्रिक टन साठवणूक क्षमता निर्माण झाली आहे. या साठवणूक क्षमतेमुळे बाजारामध्ये भाव नसताना शेतकऱ्यांना इच्छेविरुद्ध विक्री करावी लागणार नाही असे त्यांनी सांगितले.

प्रकल्प संचालक श्री. प्रदीपचंद्रन म्हणाले की, स्मार्ट प्रकल्पांतर्गत सुरु होणाऱ्या उपप्रकल्पांना कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ मिळणार नसल्याने सर्व कामे सप्टेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. यावेळी प्रकल्प संचालकांनी मार्केट लिंकेज, मशिनरी खरेदीची निविदा प्रक्रिया, बँक कर्ज, जीएसटी इत्यादी संदर्भात अडीअडचणी जाणून घेतल्या व त्याबाबत शेतकरी उत्पादक कंपन्यांना मार्गदर्शन केले.

स्मार्ट प्रकल्पांच्या माध्यमातून विभागात ५९ धान्य क्लिनिंग ग्रीटिंग युनिट, २८ दालमिल, १२ संत्रा प्रोसेसिंग युनिट निर्माण होणार आहे. विभागात ८८ शेतकरी उत्पादक कंपन्यांना प्रकल्पातून आजपर्यंत ८७ कोटी अनुदान वितरित झाले असून त्यापैकी ४७ कोटी अनुदान खर्च झाल्याची माहिती नोडल अधिकारी डॉ. नाईक यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून दिली व सविस्तर आढावा घेतला. यावेळी सभेला स्मार्ट प्रकल्पाचे अतिरिक्त प्रकल्प संचालक उदय देशमुख ऑनलाईन पद्धतीने उपस्थित होते. तसेच विभागातील जिल्हा अंमलबजावणी कक्षाचे अधिकारी उपस्थित होते.

# मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यालयात सायबर पोलीस स्टेशन शहर मार्फत सायबर जनजागृती कार्यक्रम

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अमरावती:** मातोश्री रमाबाई आंबेडकर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, श्याम नगर, अमरावती येथील मुख्याध्यापक देशमुख यांच्या उपस्थितीत शाळेतील शिक्षकवृंद मेघा सोळंके , पालकवर्ग तसेच १०० ते १५० विद्यार्थी वर्गाला सायबर जनजागृतीबाबत कार्यशाळा आयोजीत करण्यात आली होती. सदर कार्यशाळेला सपोनि प्रियंका कोटावार व पोलीस अंमलदार निखील माहुरे यांच्याकडुन मार्गदर्शन करण्यात आले व उपस्थीतांना सायबर जनजागृती पुस्तीकेचे वाटप केले आहे.

सदर कार्यशाळेमध्ये उपस्थीत विद्यार्थ्यांना डिजीटल अटक, ऑनलाईन खरेदी विक्री, ऑनलाईन गेमिंग, सोशल मिडीयाच्या अतिप्रमाणात वापराचे दुष्परिणाम, ऑनलाईन लोन ॲप, डेटींग ॲप, टास्क बेस ॲप, रेटींग ॲप, सायबर गुन्हेगारी, सोशल मिडीयाच्या माध्यमाने महिला व बालकांचे होणारे शोषण व गुन्हे याबाबत सादरीकरणाव्दारे मार्गदर्शन करण्यात येवुन विद्यार्थी व शिक्षकवृंदानी विचारलेल्या प्रश्नांची समर्पक उत्तरे देण्यात आलेली आहेत तसेच कार्यशाळेमध्ये उपस्थीतांना पोलीस आयुक्तालयातर्फे प्रकाशित करण्यात आलेली सायबर जनजागृती पुस्तीकेचे वाटप सुध्दा करण्यात आले आहे.



आजच्या दैनंदिन गतीशिल व धकाधकीच्या युगात जिथे प्रगत तंत्रज्ञानाचा वापर सर्वसामान्यापासुन ते अगदी व्यावसायीक स्तरापर्यत बेमालूमपणे केला जातो तीथे तंत्रज्ञानाच्या उपयोगीतेपलीकडे असणाऱ्या दुष्पपरिणामाकडे अजाणतेपणी असो वा जाणिवपूर्वक असो दुर्लक्ष केल्या जात असल्यामुळे पर्यायाने तंत्रज्ञानाचे वापरकर्ते सायबर गुन्हयांना नाहक बळी पडत आहेत. अगदी शालेय विद्यार्थ्यापासुन ते महाविद्यालयीन तरुण पिढी असो, व्यावसायीक, नोकरदार, जेष्ठ नागरीक, उच्चशिक्षीत असो किंवा कामगार वर्ग असो सर्वाच्या हातामध्ये मोबाईलच्या स्वरुपात आधुनिक तंत्रज्ञान आल्यामुळे व त्याच्या अतिप्रमाणात वापरामुळे कळत नकळतपणे सायबर गुन्हेगारांच्या दृष्टीक्षेपात येतो, परिणामी सायबर गुन्हयांना बळी पडण्याचे प्रमाण दैनंदिन वाढत चालले आहे. राकेश ओला, पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या संकल्पनेतुन व रमेश धुमाळ, पोलीस उपायुक्त (मुख्यालय), शिवाजी बचाटे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती शहरातील सर्व नागरिक, विद्यार्थी तसेच शासकिय व शासकिय कार्यालये, रहिवाशी संकुले व शैक्षणिक संस्था, व्यावसायीक आस्थापना तसेच धार्मिक उत्सवादरम्यान सायबर जनजागृती कार्यशाळा आयोजीत करण्यात आलेली आहे.

# राष्ट्रीय जंगी किसान शंकर पट

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अमरावती :** भाजपा अमरावती जिल्हा ग्रामीण व रविराज देशमुख मित्र परिवार व्दारा आयोजीत राष्ट्रीय भव्य जंगी किसान शंकर पट नविन कोर्ट समोरचे मैदान, मौजे तिवसा जि. अमरावती.

शुक्रवार २३ जानेवारी २०२६ ते सोमवार २६ जानेवारी २०२६ आयोजित करण्यात आला असून लाखो रुपयांची बक्षीसे ठेवण्यात आल्याची माहिती आयोजक तथा भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख यांनी दिली. तालुका गटासाठी लाखो रुपयांची बक्षीसे

-अ गट -

प्रथम बक्षिस १०००००/-, व्दितीय बक्षिस ५०,०००/-, चतुर्थ बक्षिस ४०.००० /-पाचवे बक्षिस ३५,०००/-, सहावे वधिारा २५,०००/-सातवे बक्षिस २०,०००/-, आठवे बक्षिस १५०००/-, मवये वदिक्षरा १२०००/-, दहावे बक्षिस १००००/-, अकरावे बक्षिस - ९,०००/-बारावे बक्षिस ८,०००/-, तेरावे बक्षिस ०५००/-, चौदावे बक्षिस ७,०००/-, पंधरावे बक्षिस ६५००/-

प्रवेश फी - अ गट २५००/-

- क गट- प्रथम बक्षिस ३१०००/-, व्दितीय बक्षिस १०,०००/-, तृतिय बक्षिस ६०,०००/-, तृतिय बक्षिस - १५,०००/-, चतुर्थ बक्षिस - ९,०००/-, पाचवे बक्षिस ८,०००/-, सहावे बक्षिस ४,०००/-, सातवे बक्षिस - ६.०००/-, आठवे बक्षिस ५५००/-, नववे बक्षिस ५०००/- , दहावे बक्षिस ४५००/-, अकरावे बक्षिस ४,०००/-, बारावे वक्षिस ३५००/-, तेरावे बक्षिस- ३०००/-, पौदावे बक्षिस २५००/- प्रवेश फी : क गट १५००/- असे बक्षीस ठेवण्यात आले आहे. या शंकरपाटाचा श्रोत्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# डोनाल्ड ट्रम्प : खरे देशभक्त की चतुर व्यावसायिक?

आधुनिक अमेरिकन राजकारणात डोनाल्ड ट्रम्पइतके वादग्रस्त व्यक्ती फारच थोडे झाले आहेत. समर्थकांच्या मते, तो असा नेता आहे ज्याने निष्क्रिय आणि आत्मसंतुष्ट सत्ताधाऱ्यांना आव्हान दिले आणि अमेरिकेला तिच्या आर्थिक व धोरणात्मक प्राधान्यांचा पुन्हा विचार करायला भाग पाडले. तर टीकाकारांच्या मते, तो असा विभाजनकारी नेता आहे ज्याच्या कार्यपद्धतींमुळे संस्था कमकुवत झाल्या आणि समाजातील दरी अधिक खोल झाली. मात्र खरा प्रश्न व्यक्तिमत्त्वाचा नसून कार्यक्षमतेचा आहे: ट्रम्प यांनी अमेरिकेला तिची खरी क्षमता वापरण्यास मदत केली का?

आर्थिक आघाडीवर ट्रम्प यांच्या अध्यक्षतेत काही ठोस परिणाम दिसून आले. नियममुक्ती (डिरेग्युलेशन) आणि कर कपात यांवर दिलेला भर व्यवसायातील आत्मविश्वास आणि गुंतवणूक वाढवण्यासाठी होता. समर्थकांचे म्हणणे आहे की यामुळे विशेषतः उत्पादन आणि ऊर्जा क्षेत्रात अमेरिकन कंपन्यांसाठी अधिक गतिमान वातावरण निर्माण झाले. ‧अमेरिका फर्स्ट‧ ही संकल्पना जागतिकीकरणामुळे मागे पडल्याची भावना असलेल्या लोकांमध्ये लोकप्रिय ठरली. ट्रम्प यांनी व्यापार करारांचे पुनर्मूल्यांकन केले आणि चीनबाबत कठोर भूमिका घेतली.



ट्रम्प यांचे परराष्ट्र धोरणही अपारंपरिक पण काही अंशी धोरणात्मक होते. त्यांनी जुन्या मैत्री करारांवर प्रश्न उपस्थित केले आणि नाटोच्या भागीदारांकडून अधिक जबाबदारी उचलण्याची मागणी केली, कारण अमेरिकेवर अति भार पडत असल्याचे त्यांचे मत होते. उत्तर कोरियासारख्या प्रतिस्पर्ध्यांशी थेट संवाद साधणे आणि व्यवहारप्रधान (ट्रान्झॅक्शनल) कूटनीती स्वीकारणे हे त्यांच्या धोरणाचे वैशिष्ट्य होते. समर्थकांच्या मते, हे वास्तववादी दृष्टिकोनाचे आणि अमेरिकन हितसंबंध अधिक ठामपणे जपण्याचे उदाहरण होते.

तथापि, एखाद्या राष्ट्राची क्षमता फक्त आर्थिक आकडेवारी किंवा आंतरराष्ट्रीय दर्पावरून मोजली जात नाही. राष्ट्राची खरी ताकद तिच्या संस्था, सामाजिक एकात्मता आणि दीर्घकालीन स्थैर्य यांत असते. या बाबतीत ट्रम्प यांची कामगिरी अधिक वादग्रस्त ठरते. माध्यमे, न्यायव्यवस्था आणि अगदी निवडणूक प्रक्रियेवर केलेले सततचे हल्ले अमेरिकन लोकशाहीच्या आरोग्याबाबत चिंता निर्माण करणारे होते. टीकाकारांच्या मते, सततचा राजकीय संघर्ष आणि ध्रुवीकरण यामुळे सार्वजनिक संस्थांवरील विश्वास कमी झाला, जो शाश्वत प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक असतो.

याशिवाय ट्रम्प यांची नेतृत्वशैली सहमतीपेक्षा संघर्षावर अधिक आधारित होती. यामुळे त्यांच्या समर्थकांना ऊर्जा मिळाली, पण समाजातील मोठ्या घटकांना ते दूर झालेले वाटले. देशाला एकत्र आणणाऱ्या सामायिक दृष्टीकोनाऐवजी त्यांच्या अध्यक्षतेत सांस्कृतिक आणि वैचारिक मतभेद अधिक तीव्र झाले. अमेरिकेसारख्या विविधतेने भरलेल्या देशात अंतर्गत एकता ही पूर्ण क्षमता साध्य करण्यासाठी अत्यंत महत्त्वाची असते.

एकूण पाहता, ट्रम्प यांनी काही आर्थिक आणि धोरणात्मक संधी उघडल्या, पण त्यासाठी मोठी सामाजिक आणि संस्थात्मक किंमत मोजावी लागली. त्यांनी अमेरिकेला तिच्या जागतिक भूमिकेचा आणि आर्थिक प्राधान्यांचा पुनर्विचार करायला लावले, हे लहान यश नाही. मात्र हे ‧पूर्ण क्षमते‧त रूपांतरित होते की नाही, हे व्याख्येवर अवलंबून आहे. जर क्षमता म्हणजे आक्रमक भूमिका आणि अल्पकालीन आर्थिक लाभ असेल, तर ट्रम्प यांचा दावा मजबूत ठरतो. पण जर क्षमता म्हणजे एकता, विश्वास आणि लोकशाही स्थैर्यावर आधारित शाश्वत प्रगती असेल, तर निकाल तितका स्पष्ट नाही. म्हणूनच ट्रम्प यांचा वारसा संमिश्र आहे: बदल घडवून आणणारा प्रवर्तक, पण त्याच वेळी सत्ता कशी वापरली जाते हे उद्दिष्टांइतकेच महत्त्वाचे असते, याची आठवण करून देणारा हा नेता. याची आठवण कितीतरी शतके राजकीय इतिहास काढत राहील यात शंकाच नाही.



**नितीन बक्षी**
९३७०५६०४९१

# टॉयलेट व स्मार्ट सिटी प्रकल्पाची जिल्हास्तरीय निवड



**दर्यापूर :** दर्यापूर शहरातीलआयटीआय बाभळी येथे विद्यार्थ्यांच्या तांत्रिक कौशल्याला वाव देण्यासाठी तंत्र प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रदर्शनीत फिटर, वेल्डर व इलेक्ट्रिशियन या युनिटमधील प्रथम व द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेली विविध मॉडेल्स सादर करण्यात आली. प्रदर्शनीत इलेक्ट्रिशियन प्रथम वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांनी साकारलेले 'स्मार्ट टॉयलेट' मॉडेल तसेच द्वितीय वर्षाच्या प्रशिक्षणार्थ्यांनी तयार केलेला 'स्मार्ट सिटी' प्रकल्प विशेष आकर्षण ठरले. या दोन्ही नाविन्यपूर्ण प्रकल्पांची जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनीसाठी निवड करण्यात आली आहे. या प्रसंगी उपस्थित सर्व निदेशक वर्ग तसेच आयटीआय बाभळीचे प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांच्या कल्पकतेचे व मेहनतीचे कौतुक केले. तंत्रज्ञानाच्या माध्यमातून समाजोपयोगी प्रकल्प सादर केल्याबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत त्यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या तंत्र प्रदर्शनीमुळे विद्यार्थ्यांच्या व्यावहारिक ज्ञानाला चालना मिळाली असून, आयटीआय बाभळीतील प्रशिक्षणाची गुणवत्ता पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.

३
सिटी न्यूज अकोला
शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# नरनाळा महोत्सवासाठी स्वयंसेवकांची आवश्यकता: अर्ज मागविले

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोला:** नरनाळा निसर्ग पर्यटन व सांस्कृतिक महोत्सव दि. ३० जानेवारी ते १ फेब्रुवारी दरम्यान होणार असून, त्यासाठी स्वयंसेवकांची आवश्यकता आहे. इच्छूकांनी दि. २६ जानेवारीपर्यंत पोर्टलवर किंवा अकोट वन्यजीव विभाग येथे प्रत्यक्ष अर्ज सादर करावेत, असे आवाहन उपवनसंरक्षक राहूलसिंह टोलिया यांनी केले आहे. पर्यटकांना मार्गदर्शन, माहिती देणे, नोंदणी व स्वागत व्यवस्था, स्वच्छता, विविध कामांत व आपत्कालीन स्थितीत सहकार्य आदी कामे स्वयंसेवकांकडून होणे अपेक्षित आहे. अर्ज करण्यासाठी किमान पात्रता दहावी उत्तीर्ण असून, वनविभागात पूर्वीचा अनुभव असलेले व स्थानिक उमेदवारांना प्राधान्य दिले जाईल. अर्जात नाव, पत्ता, ई-मेल, मोबाईल क्र., शैक्षणिक अर्हता, इच्छूक कामाचे स्वरूप आदी नमूद करणे आवश्यक आहे.

# अकोल्यातील रामदेव बाबा यांची बारा मंदिरे भक्ती, श्रद्धेचे प्रतिक : राधेश्याम शर्मा

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोला:** जगात रामदेव बाबा यांचे भक्त असून सामाजिक समरसता, एकता, मानवता यामुळे सर्वांना एकत्रित करण्याचे काम राजस्थानात बाबा रामदेव यांनी साडेपाचशे वर्षांपूर्वी केले. आज लोक रामदेव बाबांना पूज्य मानतात. अकोल्यात रामदेव बाबांची बारा मंदिरे भक्ती आणि श्रद्धेचे प्रतीक असल्याचे भजन सम्राट राधेश्याम शर्मा यांनी सांगितले.

स्थानिक मोठ्या राम मंदिरात रामदेव बाबा मंदिरात आयोजित रामदेव बाबा माघ उत्सव निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. रामदेव बाबांचे २४ परचे, त्यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकून कशा पद्धतीने



सामाजिक समरसता विश्वास श्रद्धा भक्तीचा परिचय दिला.

राधेश्याम शर्मा नारळवाले यांनी भजन गायले. रामदेव बाबांच्या पादुकांना अभिषेक प्रकाश पुरोहित, खुशबू पुरोहित, कुंजबिहारी जाजू, अनुसया जाजू, जया पुरोहित, महेंद्र पुरोहित, प्रमोद अग्रवाल, मनीषा अग्रवाल, आशा गोयंका, रमेश लड्ढा, अमित लड्ढा, धनंजय आढाव, विनय जोशी, विकी झुंजुनवाला, प्रकाश भुसारी, विजय अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आला. वेदपाठी पंडित जितेंद्र छांगाणी, महेश जोशी, संतोष शुक्ला, सौरभ छांगाणी, अशोक छांगाणी, दिलीप छांगाणी, विनय जोशी यांनी पौरोहित्य केले.

स्व. सुरजकरण जोशी यांनी ९० वर्षांपूर्वी सुरू केलेली परंपरा अविरतपणे सुरू आहे. स्व. सत्यनारायण बजाज, स्व. बालकिसन चांडक, स्व. छगनलालजी शर्मा, ओमप्रकाश जोशी, स्व. तुळशीराम गोयंका, स्व. नारायण सरकीवाले यांच्या परंपरेला किसन गोपाल पुरोहित, एड. महेंद्र पुरोहित, गिरीश जोशी, आशिष बनवारीलाल बजाज, किशोर खंडेलवाल, ओम प्रकाश खत्री, कृष्णा राठी पेढेवाले, ओम प्रकाश गोयंका, सतीश गोयंका, राजू बालाजी शर्मा पुढे नेत आहेत. या कार्यक्रमांमध्ये प्रकाश भुसारी, नितीन ढोले, सुमित्रा निखाडे, दीपक शर्मा, ज्योती चव्हाण, किशोर खंडेलवाल, दीपक तिवारी यांनी या परंपरेला नमन केले व रामदेव बाबा श्याम बाबा यांच्या भजनाने भक्तांना मंत्रमुग्ध केले.

# हिवरखेड नगरपरिषदेत भाजपाला शिंदेसेनेचा छुपा पाठिंबा तर नाही ना?

## ◆ उपाध्यक्षासह भाजपाचे चारही सभापती बिनविरोध

**हिवरखेड :** येथे उपाध्यक्ष सह चार सभापतीच्या निवडी संपन्न झाल्या यामध्ये एकाही पदावर शिवसेनेने आपला उमेदवार उभा न केल्यामुळे भाजपाला शिवसेना शिंदे गटाचा छुपा पाठिंबा तर नाही ना असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. हिवरखेड येथे नव्यानेच निर्माण झालेल्या नगर परिषदेची निवडणूक पार पडली या निवडणुकीमध्ये भारतीय जनता पार्टीने नगराध्यक्ष पदासह आपले पूर्ण पॅनल लढविले तर त्याविरुद्ध शिंदेसेनेने सुद्धा नगराध्यक्ष पदासह आपले काही उमेदवार शिंदेसेनेवर उभे केले या निवडणुकीमध्ये भाजपाने नगराध्यक्ष व ११ नगरसेवक निवडून आणून बहुमत मिळविले तर शिंदे सेनेला केवळ पाचच नगरसेवक निवडून आणता आले निकालानंतर काही दिवसापूर्वी उपाध्यक्ष पदाचे निवडणूक घेण्यात आली यामध्ये शिंदे सेनेला आपला उमेदवार उभा करता आला असता मात्र शिंदे सेनेने तसे न करता भाजपाला अविरोध उपाध्यक्ष पद मिळवून दिले




तसेच २० तारखेला विविध विषय समित्यांच्या सभापतीच्या निवडी घेण्यात आल्या यामध्ये सुद्धा शिंदेसेनेने भाजपाच्या बांधकाम, पाणीपुरवठा, स्वच्छता व आरोग्य तसेच महिला व बालकल्याण हे चारही सभापती निवडणुकीत शिंदेसेने कडून कोणताही अर्ज नसल्यामुळे भाजपाचे चारही सभापतीं अविरोध निवडून आले. उपाध्यक्ष व सभापती निवडणुकीत शिंदे सेनेला आपले उमेदवार उभे करता आले असते मात्र शिंदे सेनेने तसे न केल्यामुळे भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष व चारही सभापती बिनविरोध निवडून आले. यामुळे शिंदे सेनेची भूमिका संशयास्पद असून भाजपाला छुपा पाठिंबा तर दिला नाही ना ? असा प्रश्न आता नागरिकांना पडला आहे.

# अकोल्यात ९ वर्षीय हाफिज मोहम्मद हमिद रजा यांचा खत्मे-कुरआन कार्यक्रम २५ जानेवारीला

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोला:** मोहम्मद अली चौक येथील कच्छी मशिदीत ९ वर्षीय हाफिज मोहम्मद हमिद रजा इब्ने गुलाम मुर्तजा यांचा खत्मे-कुरआनचा पवित्र कार्यक्रम २५ जानेवारी २०२६, रविवार आयोजित करण्यात आला आहे. दारुल उलूम मुफ्ती-ए-आझम हिंद, शिवणी (अकोला) येथील या लहान विद्यार्थ्याने अल्पवयात पूर्ण कुरआन मुखोद्गत करून अकोला शहराचे नाव उज्ज्वल केले आहे.



कार्यक्रम नमाज-ए-फज्ञा नंतर सुरू होणार असून तजविद तज्ञ कारी-ए-कुरआ कुरआनची तिलावत करतील. या प्रसंगी हजरत अल्लामा मुफ्ती मोहम्मद सादिक अख्तर रजवी मरकजी आपले प्रवचन देतील.

संध्याकाळी नमाज-ए-ईशा नंतर कच्छी मस्जिद ट्रस्टतर्फे उपस्थित उलेमांच्या हस्ते हाफिज मोहम्मद हमिद रजा यांना आलाहजरत पुरस्कार प्रदान केला जाईल. कच्छी मस्जिद ट्रस्टचे अध्यक्ष जावेद जकरिया यांनी माहिती देत शहरातील नागरिकांना या पवित्र कार्यक्रमात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

तसेच मस्जिदचे मुतवल्ली एजाज सुर्या, नायब मुतवल्ली हाजी यासीन बच्चव, सदस्य हाजी हनीफ मलक, हाजी इम्तियाज गनोडवाला आणि हाजी फारूक भुरानी यांनीही नागरिकांना या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

# नियोजनभवनात जिल्हा नियोजन समितीची बैठक

**अकोला:** राज्याचे कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांच्या अध्यक्षतेत जिल्हा नियोजन समितीची बैठक उद्या (२३ जानेवारी) दु. १२ वा. नियोजनभवनात होणार आहे.

त्यांचा दौरा पुढीलप्रमाणे : सकाळी ११.४५ वा. जिल्हाधिकारी कार्यालयात आगमन व राखीव, दु. १२ वा. जिल्हा नियोजन समितीची बैठक, दु. २ वा. एकत्रित आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जनआरोग्य योजना महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनांची आढावा बैठक, सोयीनुसार खामगावकडे प्रयाण.

# अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ अकोला जिल्हाध्यक्ष श्याम कुलकर्णी, महिला जिल्हाध्यक्ष शकुन परांजपे

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोला:** अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ अकोला जिल्हा कार्यकारिणीचे गठन आणि पदग्रहण समारंभ अभिरुची गार्डन येथे झाला. राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. गोविंद कुलकर्णी, महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष निखिल लातूरकर, अकोला जिल्हाध्यक्ष श्याम कुलकर्णी, महिला जिल्हाध्यक्ष शकुनताई परांजपे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी अकोला जिल्हा कार्यकारिणी घोषित करण्यात आली व नियुक्तीपत्र देण्यात आले. जिल्हा अध्यक्ष म्हणून श्याम नारायण कुलकर्णी, उपाध्यक्षपदी दीपक जोशी, कपिल रावदेव, नगरसेवक निलेश देव, श्रीकांत जोशी, राजेंद्र वारे , नगरसेवक प्रशांत जोशी, महासचिव बाळकृष्ण जोशी, कोषाध्यक्ष संजय देशमुख व अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ



युवा अध्यक्ष अक्षय गंगाखेडकर व इतर कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी संघटना व कार्यपद्धतीची मुद्देसुद मांडणी केली. प्रदेश अध्यक्ष निखिल लातूरकर यांनी संघटनेचा विस्तार व सदस्य नोंदणी याबाबत मार्गदर्शन केले. अमृत स्वायत्त महामंडळाचे राज्य व्यवस्थापक दीपक जोशी यांनी अमृत योजना व त्याचे लाभ कसे घेऊ शकतो याबद्दल मार्गदर्शन केले. उदय महा यांची राजस्थान, गुजरात, महाराष्ट्र व गोवा राज्य संगठनमंत्री म्हणून डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी घोषणा केली तसेच निखिल लातूरकर यांनी राजेंद्र टाकळकर यांची विदर्भ संघटन मंत्री म्हणून घोषणा केली. अकोला महानगर अध्यक्ष अतुल पाटील यांची नियुक्ती करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन मृणाल कुलकर्णी यांनी केले तर आभार प्रदर्शन शकुनताई परांजपे यांनी केले. व कार्यक्रमाची सांगता आनंद जागीरदार व राजेश जोशी यांच्या पसायदानाने झाली.

# पिंप्री खुर्द येथील शेत मजुराच्या मुलाची सीआयएसएफ मध्ये निवड



**अकोट:** पिंप्री खुर्द येथील शेतमजुरी करणाऱ्या कुटुंबांमधील प्रमोद भगत यांचा मुलगा निखिल याने गरीबीची जाणीव ठेवत परिस्थितीवर मात करून सीआय एसएफ या पदावर निवड झाली. निखिलचे सर्वत्र कौतुक होत आहे. वडील शेतमजूरी करून आपल्या मुलाला शिकवण्यासाठी जिवाची पर्वा न करता काटकसर करून पैसे वाचवून मुलाच्या शिक्षणासाठी खर्च करीत होते.तर आई सुध्दा आपल्या घरातील कामे आटोपून पती बरोबर शेतमजुरीला जात होते. हे सर्व करून आई-वडिलांनी आपल्या मुलाला शिक्षणाची गोडी लावली. आपल्या गावासाठी नाहीतर इतर गावांतील मुला साठी पण ग्रामीण भागातल्या निखिल प्रेरणादायक ठरली आहे गावातील सर्व लोक तिचे कौतुकास्पद गोडवे गात आहेत आणि आनंदाने भरभरातून गेले आहेत की गरीब परिस्थितीवर मात करून या मुला ने बाकीच्या मुला मध्ये पण विश्वास निर्माण केला जिद्द आणि चिकाटी असली तर काहीही होऊ शकते.

# आलेगाव वनपरीक्षेत्रात सागवान व मशीन जप्त



प्रतिनिधी २३ जानेवारी

**आलेगाव:** वनपरिक्षेत्र अंतर्गत वनपरिक्षेत्र अधिकारी पवन जाधव यांना मिळालेल्या गुप्त माहिती वरून शेख कय्युम यांच्या घरी अवैधरित्या सागवान कटाईचे व कटसाईज नग तयार करण्याची कामे सुरु असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार आलेगाव वनपरीक्षेत्राचे कर्मचारी यांनी २२ जानेवारी रोजी शेख कय्युम यांचे घरी धाड टाकली. सागवान व मशीन जप्त केली.

कटसाईज लाकूड तसेच इलेक्ट्रिक रंदा मशीन, ग्राईडर, कटर ब्लेड व इतर संबंधित साहित्य अंदाजे किंमत एक लाख तीस हजार रुपये चा माल जप्त करण्यात आला. आरोपी शेख कय्युम हा मोकास्थळी हजर नव्हता. त्याचा शोध घेतला असता सध्या फरार असल्याची माहिती मिळाली . आरोपी विरुद्ध भारतिय वन अधिनियम १९२७ अन्वये वनगुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. पुढील तपास वनपरिक्षेत्र अधिकारी आलेगाव व कर्मचारी करत आहेत.

सदर कारवाई सुमंत सोळंके, उपवनसंरक्षक अकोला वनविभाग, नम्रता टाले सहाय्यक वनसंरक्षक (वने), व श्री. पवन जाधव यांच्या मार्गदर्शना खाली एम. एस. सय्यद वनपाल आलेगाव, एन. वाय. गवळी वनपाल व श्री. एन. एम. नाकाडे वनपाल यांच्या पथकाने यशस्वीरित्या पार पाडली.

# हिवरखेड चंडिका चौकात प्रभू श्रीराम मंदिर अयोध्या प्राणप्रतिष्ठा सोहळा साजरा

प्रतिनिधी २३ जानेवारी

**हिवरखेड:** श्री राम जन्मोत्सव समितीच्या वतीने गावातील स्थानिक चंडिका चौकात श्री राम मंदिर अयोध्या सोहळा साजरा करण्यात आला. यानिमित्ताने गावातील सर्व भाविकांनी श्री राम आरतीला हजेरी लावली. भाविक श्री राम नामात मग्न झाले. भाविकांनी श्री राम प्रभू दर्शनाचा लाभ घेतला.

या सोहळ्यात उपस्थित रमेश दुतोंडे संदीप इंगळे, किरण सेदानी, संजय हिवराळे, रवी गावंडे, प्रमोद निळे, विनोद ढबाले, रवी मानकर, रोहन झगळे, दत्ता कुलकर्णी, दर्शन खिरोडकार, दीपक रायबोले, पीयूष खिरैया, बाबुराव वाकोडे, नंदकिशोर शिंदपुरे, काशिनाथ अस्वार, पंकज टावरी, पवन गवई, अर्जुन खिरोडकार,

इत्यादी भाविकांसह श्रीराम सेना, बजरंग दल, अखंड युवा सेना, व श्रीराम जन्मोत्सव समितीचे पदाधिकारी कार्यवाहक उपस्थित होते.



**नगर पंचायत बार्शिटाकळी, ता. बार्शिटाकळी जि. अकोला**
**ई- निविदा सुचना**

नगर पंचायत बार्शिटाकळी जिल्हा अकोला यांच्या वतीने बार्शिटाकळी हद्दीमध्ये Animal Birth Control (ABC) कार्यक्रम / भटके कुत्रे नियंत्रण कार्यक्रमासाठी AWO निवड करणे कामाची ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http:// www. mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. १४/०१/२०२६, रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदरची ई-निविदा दि. २१/०१/२०२६ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत भरणा करण्यात येईल. इतर अटी व शर्ती http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुकांनी आपल्या ई-निविदा उपरोक्त शासनाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन भरणा करावी.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत बार्शिटाकळी**

**बार्शिटाकळी नगर पंचायत , ता. बार्शिटाकळी- जि. अकोला**
**ई- निविदा मुदतवाढ सुचना**

बार्शिटाकळी नगरपंचायत जिल्हा अकोला यांच्या वतीने बार्शिटाकळी नगरपंचायत हद्दीमध्ये Animal Birth Control - ABC कार्यक्रम / भटके कुत्रे नियंत्रण कार्यक्रमासाठी AWO निवड करणे कामाची ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http:// www.mahatenders. gov.in या संकेतस्थळावर दिनांक १४/०१/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आलेली होती. (निविदा क्र. **2026_DMA_1269144_1**) परंतु सदरील निविदेस प्रतिसाद न मिळाल्याने सदरील निविदेस सात दिवसांची दिनांक ३०/०१/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. तरी इच्छुकांसाठी इतर अटी व शर्थी **http://www.mahatender.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. इच्छुकांनी आपल्या ई-निविदा उपरोक्त शासनच्या संकेतस्थळावर ऑनलाइन भरणा करावी.

**मुख्याधिकारी**
**बार्शिटाकळी, नगरपंचायत**

# रानडुक्करामुळे दुचाकी अपघात, युवक जखमी

वि. प्रतिनिधी २३ जानेवारी

**कुटासा:** कावसा-कुटासा मार्गावर वन्य प्राण्यांच्या वाढत्या वावरामुळे अपघातांचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढताना दिसत आहे. अकोटहून दहीहांडा येथे दुचाकीवरून जात असलेल्या दोन युवकांचा अपघात रानडुक्कर अचानक रस्त्यावर आल्याने झाला. ही घटना कावसा गावाजवळ घडली.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, रस्त्याच्या कडेला असलेल्या झुडपातून अचानक रानडुक्कर रस्त्यावर धावून आल्याने दुचाकीस्वाराचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि दुचाकी घसरून युवक रस्त्यावर पडले. सुदैवाने या घटनेत जीवितहानी झाली नाही. मात्र दोघांपैकी एका युवकाच्या हाताला गंभीर दुखापत झाल्याची माहिती आहे. जखमी युवकाला तातडीने उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले. कुटासा परिसरात मागील काही दिवसांपासून रानडुक्कर, नीलगाय व इतर वन्य प्राण्यांचा वावर वाढला आहे. रात्री आणि पहाटेच्या सुमारास हे प्राणी मुख्य रस्त्यांवर येत असल्याने वाहनचालकांसाठी मोठा धोका निर्माण झाला आहे. यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले असून वारंवार अपघातांच्या घटना घडत आहेत.

# अयोध्येतील राम मंदिराचा वर्धापन दिन सोहळा अकोल्यात जल्लोषात साजरा

## ◆ ज्येष्ठ नेते पवन पाडिया यांच्या उपस्थितीत राम भक्तांचा भक्तीपूर्ण जल्लोष

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोला:** अयोध्येतील प्रभू श्रीरामचंद्रांच्या मंदिरातील मूर्ती स्थापनेला दोन वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने अकोल्यात ज्येष्ठ नेते पवनजी पडिया यांच्या नेतृत्वात भक्तीपूर्ण जल्लोषाचा सोहळा साजरा करण्यात आला. संपूर्ण भारतवासीयांचे तसेच संपूर्ण जगातील हिंदू बांधवांचे आराध्य दैवत असलेल्या प्रभू श्रीरामचंद्रांच्या अयोध्येतील नवनिर्मित भव्य-दिव्य मंदिरामध्ये प्रभू श्रीरामचंद्रांची मूर्ती स्थापना २२ जानेवारी २०२४ रोजी करण्यात आली. भारताचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते पार पडलेल्या या स्थापना सोहळ्याला गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ रोजी दोन वर्षे पूर्ण झाली. या निमित्ताने अकोल्यातील टॉवर चौक ते रतनलाल प्लॉट चौक मार्गावरील हनुमान मंदिरामध्ये गुरुवारी सकाळी भक्तीपूर्ण जल्लोषात वर्धापन दिन सोहळा पार पडला. भाजपचे ज्येष्ठ नेते, महानगरपालिकेचे माजी सभापती पवनजी पाडिया यांच्या मार्गदर्शनात व प्रमुख उपस्थितीत या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. श्री हनुमान मंदिर येथील प्रभू श्रीराम मूर्तीची पवनजी पाडिया व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पूजा-अर्चना व आरती करून प्रसाद वाटप करण्यात आले.



# आंतरराष्ट्रीय अबॅकस व वैदिक मॅथ स्पर्धेत विद्यार्थ्यांचे सुयश

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोट:** बिरला ओपन मांईड इंटरनॅशनल स्कुल, अमरावती येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय अबॅकस व वैदिक मॅथ ओलंपियाड स्पर्धेमध्ये येथील इन्स्पायर अबॅकस व वैदक मॅथ या संस्थेच्या विद्यार्थ्यांनी ८ मिनिटामध्ये १०० पैकी १०० मार्क घेवुन या परीक्षेमध्ये ग्रँड मास्टरहा अवार्ड घेवुन आकोटचा मान उचांविला.



यामध्ये ग्रँड मास्टर मनश भारंबे, प्रहर्श चिखले, सेजल तराळे, श्रावणी भारंबे, श्रीहान नाथे, स्वराज तायडे, आदित्य हरकंठ, दर्शन सिरसाठ, स्वरूपा कुलट, ईश्वरी पाथ्रीकर, प्रत्युष घाटोळ, रियांश लहाने, शिवराज पाथ्रीकर, क्रिष्णा पखान, पार्थ ओझा हे विद्यार्थी सर्वोकृष्ट ग्रँड मास्टर होण्याचा मान पटकविला. तर आरूष घाटोळ, मनस्वी निमकर, राजविर देशमुख, दर्शिल घाटोळ, कैवल्य खवले, संस्कृती देवर, विर सुकलकर, विरीका अग्रवाल, कृष्णाली कौलखेडे, निधी ठाकूर, पियुश कलोटकर, रोहीत घुगे, सानवी उपासे, श्रावणी कुलट, स्वानंद खाजोने, स्वराज बहादुरे, अक्षरा कथलकर, आराध्य ओलंबे, अर्ष राठी, राम सुकळकर, श्रेया पखान, स्वरा कलोटकर यांनी प्रथम मिरीट क्रमांचे मानकरी ठरले.

तसेच मनस्वी चिखले, श्रीद बहादुरे, श्रीहरी बेलसरे, स्वराली गणोरकार, अनुष्का कुलट, आराध्य पखान, आर्या कथलकर हे विद्यार्थी द्वितीय श्रेणीचे मानकरी ठरले.

तसेच रणविर देशमुख, अनन्या चिखले, अर्णवी चिखले, देवांशी गणोरकार, स्वरा चिखले, अंशिका बहादुरे तृतिय मिरीट मध्ये आले.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ

शुक्रवार, दि. २३ जानेवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# शिक्षक-शिक्षकेतरांच्या प्रश्नांवर तोडगा; ५७ वैद्यकीय प्रस्तावांना ऑन द स्पॉट मंजुरी

प्रतिनिधी २३ जानेवारी



**यवतमाळ :** विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या वतीने यवतमाळ जिल्ह्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित समस्यांवर तोडगा काढण्यासाठी शिक्षण अधिकारी (माध्यमिक) कार्यालयात समस्या निवारण सभेचे आयोजन करण्यात आले. मा. शिक्षक आमदार तथा संघाचे सरकार्यवाह सुधाकरराव अडबाले, प्रांतिक अध्यक्ष अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वाखाली ही सभा पार पडली.

या सभेत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे तब्बल ५७ वैद्यकीय प्रस्ताव ऑन द स्पॉट मंजूर करण्यात आले. तसेच प्रलंबित वरिष्ठ श्रेणी प्रस्ताव व मुख्याध्यापक मान्यता प्रस्ताव तात्काळ मंजूर करून संबंधित शिक्षकांना देण्यात आले.

संघाचे जिल्हाध्यक्ष पवन बन यांनी मांडलेल्या एकूण ४८ प्रश्नांवर सविस्तर व सकारात्मक चर्चा करण्यात आली. यातील अनेक प्रश्न समाधानकारक रितीने सोडविण्यात आल्याने उपस्थित शिक्षकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले. भविष्य निर्वाह निधी (पीएफ) स्लिप ३१ मार्चपर्यंत न मिळाल्यास १ एप्रिलपासून शिक्षण अधिकारी कार्यालयासमोर संपूर्ण जिल्हा कार्यकारिणी उपोषणास बसेल, असा इशारा जिल्हाध्यक्ष पवन बन यांनी मा. शिक्षक आमदार सुधाकरराव अडबाले यांच्या परवानगीने दिला.

सभेस शिक्षणाधिकारी (माध्यमिक) पागोरे, उपशिक्षणाधिकारी गोडे, डाफ, नाईक, वेतन पथक अधीक्षक वानखडे, सर्व विस्तार अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संघटनेच्या वतीने जिल्हाध्यक्ष पवन बन व जिल्हा कार्यवाह रामकृष्ण जीवतोडे यांनी समस्यांचे सविस्तर वाचन केले.

यावेळी वर्धा जिल्हा कार्यवाह सालंकार, विमाशीचे उमेदवार दिलीप कडू, मुरलीधर धनरे, आनंद मेश्राम, मनोज जिरापुरे, मंगला वडतकर, श्रावणसिंग वडते, श्याम बोडे, अशोक आकूलवार, विजयराव विसपुते, गुलाब सोनवणे, श्रीकांत अंदुरकर, साहेबराव धात्रक, सुरेंद्र कडू, भूमन्ना भूमकंटीवार, भूपेंद्र देरकर, संतोष हेडाऊ, उमाकांत राठोड, नागोराव चौधरी, डॉ. इर्शाद खान, इमरान, विनोद मंगाम, गुंडेवाड, नितीन गावंडे यांच्यासह संघटनेचे पदाधिकारी, समविचारी संघटनांचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने समस्याग्रस्त शिक्षक उपस्थित होते.

# उमरखेड न.प.विषय समिती सभापतींची निवड

## बांधकाम-प्रकाश शिकारे, आरोग्य-वीरेंद्र खंदारे, शिक्षण-रसूल पटेल, पाणीपुरवठा-स्वाती ठाकरे



प्रतिनिधी २३ जानेवारी

**उमरखेड :** येथील नगर परिषदेच्या विविध विषय समित्यांच्या सभापतींची निवड आज नगर परिषदेच्या सभागृहात आयोजित विशेष सभेत करण्यात आली. उपाध्यक्षपदाच्या निवडीनंतर निर्माण झालेली कार्यकर्त्यांमधील अस्वस्थता दूर करण्याचा प्रयत्न या विषय समिती सभापतींच्या निवडीमधून करण्यात आल्याचे चित्र आहे.

नगर परिषदेतील स्थायी समितीच्या अध्यक्षपदी नगराध्यक्षा तेजश्री संतोष जैन यांची निवड झाली. स्थायी समिती व इतर समित्यांमध्ये भाजपकडून सुरेंद्र कोडगीरवार, तर जनशक्ती पॅनलकडून गोपाल अग्रवाल व साजिदउल्ला जहागीरदार यांचा समावेश करण्यात आला आहे.

इतर विषय समित्यांच्या सभापतीपदी उपाध्यक्ष जुबेर कुरशी यांच्याकडे नियोजन समितीची जबाबदारी देण्यात आली आहे. शिवसेना (उबाठा)च्या स्वाती गजेंद्र ठाकरे यांची पाणीपुरवठा समितीच्या सभापतीपदी निवड झाली आहे. बांधकाम समितीच्या सभापतीपदी प्रकाश शिकारे, आरोग्य समितीच्या सभापतीपदी वीरेंद्र खंदारे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी फरजाना सय्यद रहीम, तर महत्त्वपूर्ण असलेल्या शिक्षण समितीच्या सभापतीपदी रसूल पटेल यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या सभेत सभापतीपदांसोबतच स्थायी समितीतील सदस्य तसेच सर्व विषय समित्यांमधील सदस्यांचीही निवड करण्यात आली. उमरखेड नगरपालिकेत काँग्रेस, शिवसेना (उबाठा) व जनशक्ती पॅनल यांनी एकत्र येऊन जनशक्ती पॅनल स्थापन केला असून, या आघाडीला अध्यक्षपदासह १७ नगरसेवकांचे संख्याबळ आहे. विरोधी भाजपकडे नऊ नगरसेवक आहेत.

निवड प्रक्रिया निवडणूक अधिकारी सखाराम मुळे व मुख्याधिकारी डॉ. अजय कुरवाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी जनशक्ती पॅनलचे तसेच भाजपचे नगरसेवक व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शिवसेना (उबाठा) ची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न

- जनशक्ती पॅनलमधील घटक पक्ष असलेल्या शिवसेना (उबाठा)च्या नगरसेविका स्वाती गजेंद्र ठाकरे यांची पाणीपुरवठा समितीच्या सभापतीपदी नियुक्ती करण्यात आल्याने पक्षाला महत्त्वाच्या समितीत स्थान देण्यात आले आहे. या निर्णयामुळे स्थानिक पातळीवरील शिवसेना (उबाठा) कार्यकर्त्यांची नाराजी दूर करण्याचा प्रयत्न जनशक्ती पॅनलकडून करण्यात आल्याचे मानले जात आहे.

# उमरखेड शहरात गोवंश कत्तल प्रकरणात पाच जण अटक

प्रतिनिधी २३ जानेवारी

**यवतमाळ :** जिल्ह्यातील उमरखेड शहरात गोवंश जातीच्या जनावराची कत्तल करून गोमांस विक्री करणाऱ्या टोळीवर पोलिसांनी कारवाई केली. गोपनीय माहितीवरून केलेल्या छाप्यात पाच आरोपींना रंगेहाथ पकडण्यात आले असून चार किलो गोमांसासह ३ हजार १५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षक कुमार चिंता यांच्या थेट मार्गदर्शनाखाली ही कारवाई मंगळवारी (२१ जानेवारी) सायंकाळी चार वाजून दहा मिनिटांनी ताजपुरा वार्डातील ताजपुरा मस्जिदजवळील एका बंदिस्त जागेत पार पडली. या कारवाईत सहभागी असलेल्या पथकातील कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे काम करून आरोपींना ताब्यात घेतले. शकील हमद मोहम्मद युसुफ डॉ. आंबेडकर वार्ड, अतिक अहमद मोहम्मद ईस्माईल, शेख मुनाफ शेख बाबु, अब्दुल करीम मोहम्मद युनुस, शेख मुसा शेख ईसा अशी आरोपींची नावे आहे. घटनास्थळावरून चार किलो गोमांस (अंदाजे किंमत ८०० रुपये), पाच वजनकाटे आणि पाच सुरी (एकूण २,३०० रुपये) असा एकूण ३,१५० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ (सुधारणा २०१५) च्या कलम ५, ५(क), ९ आणि ९(अ) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार प्रकाश बोंबले (क्र. २२०१) हे करीत आहेत. ही कारवाई अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी (अतिरिक्त प्रभार) हर्षवर्धन बी.जे. आणि पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश मुंढे, पोलीस उपनिरीक्षक सागर इंगळे, पोलीस उपनिरीक्षक सुदर्शन वानोळे, पोलीस हवालदार प्रकाश बोंबले, पोलीस शिपाई संदीप जाधव यांनी केली.

# उमरखेड वकील संघाची निवडणूक; अध्यक्षपदी शिवाजीराव वानखेडे

प्रतिनिधी २३ जानेवारी

**उमरखेड :** उमरखेड वकील संघाची निवडणूक पार पडली. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या निवडणुकीत अध्यक्षपदी ॲड. शिवाजीराव वानखेडे यांची निवड झाली, तर उपाध्यक्षपदी ॲड. निरंजन कदम यांनी विजय मिळवला.

अध्यक्षपदासाठी ॲड. शिवाजीराव वानखेडे व ॲड. निरंजन दवणे यांच्यात थेट लढत झाली. मतदानात वानखेडे यांना ६२, तर दवणे यांना ६० मते मिळाली. दोन मते अवैध ठरल्याने अवघ्या दोन मतांच्या फरकाने शिवाजीराव वानखेडे अध्यक्षपदी निवडून आले.

उपाध्यक्षपदासाठी ॲड. निरंजन कदम यांना ६२, तर ॲड. विशाल रोडे यांना ५९ मते मिळाली. तीन मते अवैध ठरल्याने तीन मतांच्या फरकाने निरंजन कदम विजयी झाले. सचिवपदासाठी ॲड. श्रीकांत कदम यांना ६७, तर ॲड. श्रेयस भागवत यांना ५४ मते मिळाली. तीन मते अवैध ठरली असून, १३ मतांच्या फरकाने श्रीकांत कदम सचिवपदी निवडून आले.

कोषाध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत ॲड. मनीष भट्टड यांना ७०, तर ॲड. अजय पाईकराव यांना ४९ मते मिळाली. पाच मते अवैध ठरली असून, २१ मतांच्या फरकाने मनीष भट्टड कोषाध्यक्षपदी विजयी झाले. निवडणूक निकाल जाहीर होताच विजयी पदाधिकाऱ्यांचे वकील बांधवांकडून गुलाल उधळून जल्लोषात स्वागत करण्यात आले. वकील संघाच्या पदाधिकारी निवडणुकीत पहिल्यांदाच इतकी चुरस पाहायला मिळाल्याची चर्चा यावेळी होती.



निवडणूक प्रक्रिया पिठासीन अधिकारी तथा माजी अध्यक्ष ॲड. निरंजन पाईकराव व ॲड. महेश वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

दरम्यान, नवनियुक्त अध्यक्ष ॲड. शिवाजीराव वानखेडे यांनी उमरखेड येथे अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयाची निर्मिती करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मनोगत व्यक्त केले.

# १०० धारकरी धारातीर्थ गडकोट मोहिमेसाठी रवाना

प्रतिनिधी २३ जानेवारी



**आर्णी :** आर्णी विभागातील १०० हून अधिक धारकरी मंगळवार, दि. २२ जानेवारी रोजी लोहगड ते राजमाची या ऐतिहासिक किल्ल्यांवरील धारातीर्थ गडकोट मोहिमेसाठी उत्साहात रवाना झाले. या वेळी शहरातील शिवनेरी चौक येथे मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. धारकऱ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला हार अर्पण करून अभिवादन केले. यानंतर औक्षण करून आणि नागरिकांच्या शुभेच्छा स्वीकारत मोहिमेची सुरुवात करण्यात आली.

मोहिमेच्या पार्श्वभूमीवर शहरातील अनेक नागरिकांनी उपस्थित राहून धारकऱ्यांचा सत्कार केला. शिवनेरी चौक परिसरात सकाळपासूनच उत्साही वातावरण पाहायला मिळाले. "हर हर महादेव" आणि "जय भवानी, जय शिवाजी"च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. गेल्या पाच वर्षांपासून आर्णी विभागातून दरवर्षी धारकरी या मोहिमेत सहभागी होत आहेत. पहिल्या वर्षी केवळ १, दुसऱ्या वर्षी २, तिसऱ्या वर्षी ८, चौथ्या वर्षी ४० धारकरी सहभागी झाले होते. यंदा मात्र आर्णी विभागातून १०० पेक्षा अधिक धारकरी सहभागी होत असल्याने ही मोहिम विशेष ठरली आहे.

तालुक्यातील वरूड येथून सुमारे ४० धारकरी सहभागी झाले असून जवळा, सुकळी, तळणी, विठोली, चिखली यांसह परिसरातील अनेक गावांमधून धारकरी मोहिमेसाठी रवाना झाले आहेत. सर्व धारकऱ्यांना निरोप देण्यासाठी शहरातील हिंदू बांधव मोठ्या संख्येने शिवनेरी चौकात उपस्थित होते.

# शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी पृथ्वीराज चव्हाण



प्रतिनिधी २३ जानेवारी

**महागाव :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कोनदरी येथे नव्याने शाळा व्यवस्थापन समितीची सर्वानुमते निवड करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी पृथ्वीराज मधुकर चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे.

बुधवार, दि. २१ जानेवारी रोजी शाळेच्या प्रांगणात विशेष पालक सभा घेण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक सतीश विश्वनाथ गेडाम होते.

यावेळी सरपंच, बाजार समितीचे सभापती रविंद्र पवार, ग्रामपंचायत सदस्य, पालकवर्ग व शिक्षकवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सभेत शासन निर्णयानुसार आरक्षणाचे नियम पाळून समितीची रचना करण्यात आली. उपाध्यक्षपदी सौ. अश्विनी विनोद राठोड यांची निवड करण्यात आली. सचिव म्हणून मुख्याध्यापक सतीश गेडाम, शिक्षणतज्ज्ञ म्हणून प्रमोद धर्मा जाधव यांची नियुक्ती करण्यात आली.

समितीमध्ये रेखा मधुकर आठवले, अनिल नथू राठोड, अर्चना राजेश रत्ने, आरती रामप्रसाद राठोड, स्वाती संतोष आठवले, लता बालाजी पारधी, मनील वसंता राठोड, रामराव शामराव पोटे, सखाराम बळीराम मेदराम यांचा समावेश आहे. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून कु. अनन्या अरविंद चव्हाण व चि. रोहन निलेश राठोड यांची निवड करण्यात आली.

## निकृष्ट बियाण्यांमुळे वणीतील शेतकरी संकटात

प्रतिनिधी २३ जानेवारी

**वणी :** तालुक्यात खरीप २०२५-२६ मध्ये 'विगर' कंपनीच्या निकृष्ट सोयाबीन बियाण्यांमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. अनेक शेतात उगवण न झाल्याने व कमी दर्जाचे पीक आल्याने उत्पादन घटले आणि शेतकरी आर्थिक-मानसिक संकटात सापडले. २६ नोव्हेंबर व १६ डिसेंबर रोजी कृषी विभाग व जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रारी देऊनही कारवाई नाही. म्हणून मनसे आक्रमक झाली आहे. कंपनीला काळ्या यादीत टाकणे, नुकसानभरपाई देणे व तातडीचा हस्तक्षेप करण्याची मागणी आहे. २८ जानेवारीपर्यंत न्याय न मिळाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला. उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन देऊन प्रती कृषिमंत्री व जिल्हाधिकाऱ्यांना पाठवण्यात आल्या असून प्रशासनाच्या भूमिकेकडे वणी तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# बुद्धीबळ स्पर्धेत श्रावस्ती शेंद्रेची जिल्हास्तरावर निवड

प्रतिनिधी २३ जानेवारी

**आर्णी :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा प्रशासन, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने "चला खेळूया" यवतमाळ जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन २० व २१ जानेवारी रोजी स्थानिक महंत दत्तराम भारती विद्यालयात करण्यात आले होते. ग्रामीण भागातील खेळाडूंना प्रोत्साहन देऊन भविष्यातील चॅम्पियन घडविण्याच्या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत एथलेटिक्स, बुद्धीबळ, व्हॉलीबॉल, कुस्ती, तिरंदाजी, टेबल टेनिस, कबड्डी, खो-खो, बॅडमिंटन आदी क्रीडा प्रकारांचा समावेश होता. १७ वर्षांखालील गट-२ मध्ये आर्णी, यवतमाळ, दारव्हा व नेर येथील महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.



या स्पर्धेत आर्णी येथील मातोश्री शांताबाई तु. चव्हाण विद्यालयाची नववीतील विद्यार्थिनी कु. श्रावस्ती अरुण शेंद्रे हिने बुद्धीबळ स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत जिल्हास्तरावर निवड मिळवली. कु. श्रावस्ती ही मूळ दाभडी (ता. आर्णी) येथील रहिवासी असून तिच्या यशाबद्दल सर्वत्र कौतुक होत आहे.

जिल्हास्तरावर निवड झाल्याबद्दल कु. श्रावस्ती शेंद्रेचा शाळेचे अध्यक्ष डॉ. पंडितराव चव्हाण, संस्थेचे व्यवस्थापक उल्हास चव्हाण, मुख्याध्यापक मंगेश ब्रम्हकार तसेच शिक्षक सचिन शिंदे, किशोर लाखकर, आशिष मोरे, कु. दिपमाला कावळे, राहुल चव्हाण व मयुरी चव्हाण यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# माजी सभापती सुखदेवराव भाकरे यांचे निधन

प्रतिनिधी २३ जानेवारी

**नेर :** नेर पंचायत समितीचे माजी सभापती सुखदेवराव



भाकरे यांचे आज सकाळी 9 च्या सुमारास हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले, ते ७५ वर्षांचे होते,

राजकीय, साहित्यप्रेमी, व समाजभिमुख व्यक्तिमत्व अशी त्यांची ओळख होती,१९७९ मध्ये पहिली जिल्हा परिषद निवडणूक लढल्यानंतर सलग ११ वर्ष पंचायत समिती सभापती पद त्यांनी भूषविले, खरेदीविक्री संघ, बाजार समिती अशा अनेक ठिकाणी त्यांनी आपली राजकीय कारकीर्द निभावली, त्यांना आज सकाळी हृदविकाराच्या तीव्र झटका आल्याने त्यांचे निधन झाले असून त्यांच्यावर रेणुकापूर येथील मूळ गावी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे.त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा स्नेहल भाकरे (संचालक य. जि. म. बँक), सचिन भाकरे, प्रफुल भाकरे, मुलगी, सून, नातवंडे, असा आप्त परिवार आहे.

# सनातन संस्कृतीच्या रक्षणासाठी धर्महुंकार; २४ जानेवारीला हिंदू संमेलन

प्रतिनिधी २३ जानेवारी



**बाभुळगाव :** सनातन धर्म ही केवळ उपासना नसून ती आपल्या अस्मितेची, संस्कृतीची आणि पिढ्यान्पिढ्यांची ओळख आहे. या सनातन संस्कृतीच्या रक्षणासाठी, हिंदू समाजाच्या एकतेसाठी आणि राष्ट्रप्रेमाची भावना अधिक प्रबळ करण्याच्या उद्देशाने बाभुळगाव येथे शुक्रवार, दि. २४ जानेवारी रोजी विशाल हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. सकल हिंदू समाजाच्या वतीने होणारे हे संमेलन दुपारी १२ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत बाभुळगाव-कळंब रोडलगत असलेल्या वृंदांगण सेलिब्रेशन लॉन येथे होणार आहे.

या संमेलनासाठी गजानन शिंदे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पवन तनय चॅरिटेबल ट्रस्ट, हिंगणघाटचे ह.भ.प. गजानन कपिले महाराज (आळंदीकर) हे मार्गदर्शन करणार असून, त्यांच्या प्रेरणादायी विचारांतून हिंदू समाजाला नवी दिशा व बळ मिळणार आहे.

संमेलनाच्या प्रारंभी दुर्गा माता मंदिर (पोलीस स्टेशनजवळ), बाभुळगाव येथून भव्य शोभायात्रेला सुरुवात होणार आहे. जयघोष, भगवे ध्वज आणि राष्ट्रप्रेमाच्या घोषणांनी संपूर्ण बाभुळगाव परिसर दुमदुमून जाणार आहे. संमेलनाची सांगता भारतमातेच्या आरतीने व महाप्रसादाने करण्यात येणार असून, श्रद्धा आणि सेवाभावाचा संगम अनुभवायला मिळणार आहे.

या कार्यक्रमाच्या पार्श्वभूमीवर रविवार, दि. १९ जानेवारी रोजी सायंकाळी संमेलनस्थळी ध्वजस्थापना करून कार्यक्रमाची औपचारिक सुरुवात करण्यात आली. यावेळी आयोजन समितीचे अध्यक्ष मिलिंद नवाडे, उपाध्यक्ष प्रतिन भूराने यांच्यासह विविध पदाधिकारी, महिला कार्यकर्त्या व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या चेहऱ्यावर हिंदू जागरणाचा उत्साह व अभिमान स्पष्टपणे दिसून येत होता.

संमेलन यशस्वी करण्यासाठी नियोजन समितीचे संयोजक विवेक बुरेवार, सहसंयोजक प्रसाद येवतीकर यांच्यासह असंख्य कार्यकर्ते अहोरात्र परिश्रम घेत आहेत. सनातन धर्म, हिंदू संस्कृती आणि सामाजिक एकतेचे प्रतीक ठरणाऱ्या या विशाल हिंदू संमेलनास पंचक्रोशीतील नागरिकांनी कुटुंबीयांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मूर्तींचे लोकार्पण

प्रतिनिधी २३ जानेवारी



**बाभूळगाव :** खडकसावंगा येथील संतभूमीवर भगवान बुद्ध व बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आसनस्थ भव्य मूर्तींचे लोकार्पण श्रद्धा व उत्साहात पार पडले. या लोकार्पणामुळे संतभूमी बुद्ध-आंबेडकरी विचारांचे प्रभावी केंद्र म्हणून अधिक सशक्त झाली आहे.

स्टेट हायवे क्रमांक ३०० लगत उभारण्यात आलेल्या या मूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत असून समता, करुणा, बंधुता व न्यायाचा संदेश देत आहेत. १४ फूट उंचीची बुद्धमूर्ती ही जनतेच्या दानातून साकारण्यात आली असून तिचे उद्घाटनही जनतेच्या हस्ते करण्यात आले, हे या उपक्रमाचे वैशिष्ट्य ठरले. भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्ती दिवंगत शिवनारायण निमसडकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांच्या पत्नी संजीवनी निमसडकर व कन्या साक्षी निमसडकर यांनी संतभूमीला दान स्वरूपात अर्पण केल्या. कार्यक्रमाची सुरुवात भिक्खु संघ व अनागारिक संघाच्या वतीने बुद्धपूजा व परित्तपाठाने झाली. संतभूमीचे संस्थापक आचार्य डॉ. मिलिंद बोधी यांनी संतभूमीच्या वाटचालीचा आढावा घेत समाजप्रबोधनाचे कार्य अखंड सुरू राहील, असा विश्वास व्यक्त केला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भारत कापशीकर होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये डॉ. अभिजित चव्हाण, अमित गणवीर, गौतम लांडगे, माजी सभापती सचिन महल्ले यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. अमरावती, नागपूर, वर्धा व यवतमाळ जिल्ह्यातून मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती लावली. सूत्रसंचालन विजय दवाळे यांनी केले. प्रस्ताविक वनमाला कापशीकर यांनी मांडले तर आभार प्रदर्शन सविता खाकसे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संतभूमीचे विश्वस्त, सदस्य व विविध संघटनांनी सहकार्य केले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शुक्रवार दि. २३ जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## प्रजासत्ताक दिनी प्लास्टिक ध्वज विक्री व वापरास मनाई



**वाशिम :** २६ जानेवारी या राष्ट्रीय प्रजासत्ताक दिनी लहान आकारातील कागदी व प्लास्टिक राष्ट्रध्वजांची विक्री मोठया प्रमाणात केली जाते. शालेय विद्यार्थी व लहान मुले यांच्यासह अनेक व्यक्ती राष्ट्रभक्ती व उत्साहापोटी राष्ट्रध्वज विकत घेतात व त्याच दिवशी किंवा दुसऱ्या दिवशी इतरत्र टाकून देतात. त्यामुळे राष्ट्रध्वजाचा अवमान होतो. काहीवेळा तसेच विशेष कला व क्रीडा प्रसंगी वैयक्तिकरित्या वापरण्यात येणारे राष्ट्रध्वज फेकले जातात. रस्त्यात विखुरलेले राष्ट्रध्वज जर प्लास्टिकचे असतील तर प्लास्टिक बरेच दिवस नष्ट होत नाही. त्यामुळे बरेच दिवस त्याच ठिकाणी पडून असतात. राष्ट्रहिताचे दृष्टीने ही गंभीर बाब आहे. राष्ट्रध्वजाचा अवमान होणार नाही, त्याअनुषंगाने प्लास्टिकच्या राष्ट्रध्वजाची विक्री व वापर कोणही करु नये. राष्ट्रध्वजाचा आदर करणे हे देशाच्या प्रत्येक नागरीकाचे कर्तव्य आहे.



# जिल्ह्यात कारवाईसाठी मात्र, अवैध सावकाराविरोधात धाडसत्र !

## *सहकार विभागाकडून ८ पथकांमार्फत एकाच दिवशी झडतीसत्र

•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

वाशिम शहर व तालुक्यात अवैध सावकारी व्यवहाराबाबत महेश गुरुमुखदास रामवाणी, रा. सिंधी कॅम्प व राम सत्यनारायण यादव, रा. शुक्रवार पेठ, वाशिम यांनी सहकार विभागाकडे दाखल केलेल्या दोन तक्रारींच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करण्यात आली. या चौकशीत प्राप्त माहितीच्या आधारे महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ चे कलम १६ अंतर्गत पुढील चौकशीसाठी २२ जानेवारी रोजी सहकार विभागाच्या ८ पथकांमार्फत झडती व धाडसत्राची कार्यवाही करण्यात आली.



सदर झडती कार्यवाहीदरम्यान आर्थिक व्यवहारांचा उल्लेख असलेले व कथितरित्या सावकारी व्यवसायाशी संबंधित विविध दस्तऐवज व कागदपत्रे जप्त करण्यात आली. यामध्ये रोख वह्या, खतावणी, कोरे धनादेश, कोरे स्टॅम्प, स्थावर मालमत्तेची खरेदीखत व इसारचिठ्ठ्या यांचा समावेश असून, ही कागदपत्रे पंचनाम्याद्वारे ताब्यात घेण्यात आली आहेत. सदर प्रकरणी पुढील चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात आली आहे.

यांच्या नियंत्रणाखाली सहकार प्रशासन व लेखापरीक्षण विभागातील एकूण ३८ कर्मचारी ८ पथकांमध्ये नियुक्त करण्यात आले होते. तसेच पंच म्हणून तहसीलदार वाशिम यांचे अधिनस्त १६ ग्राम महसूल अधिकारी शासकीय पंच म्हणून नियुक्त करण्यात आले होते. झडती पथकांच्या सुरक्षेसाठी पोलिस अधीक्षक कार्यालयातील विविध शाखांमधील १६ पोलिस अधिकारी व कर्मचारी यांचा बंदोबस्त पुरविण्यात आला होता.

सदर धाडसत्राची कार्यवाही जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, जिल्हा पोलिस अधीक्षक अनुज तारे, गौतम वर्धन विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती आणि गितेशचंद्र साबळे जिल्हा निबंधक (सावकारी) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आली.नागरिकांना आवाहन जिल्ह्यातील अवैध सावकारांविरोधात नागरिकांनी सहकार विभागाच्या संबंधित तालुका सहायक निबंधक, सहकारी संस्था किंवा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम कार्यालयाकडे तक्रारी दाखल कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे. अशी माहिती आर. आर. सावंत,सहायक निबंधक (प्रशासन) अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम यांनी दिली आहे.

### अवैध सावकार...

**गिरधारीलाल जगन्नाथ अग्रवाल**
**मारोती विठ्ठल ठाकरे**
**सुरज बाळू सातपुते**
**स्वप्नील राजेश इंगोले**
**अजय प्रकाश इंगळे**
**राहुल ऊर्फ बंटी प्रकाश सिरसाट**
**वाजीद खान समशेर खान**

### झडती कार्यवाहीची ठिकाणे :

* संतोष विहार, गुरुवार बाजार, अग्रसेन भवन, वाशिम * खरोळा, ता. जि. वाशिम * निमजगा पो. ता. वाशिम * ए. विंग, पाटणी कमर्शियल, वाशिम *सोनखास रोड, लाखाळा, वाशिम * अल्लाडा प्लॉट, वाशिम *बागवानपुरा, ता. जि. वाशिम

### या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली कारवाई

रवि आकुलवार, सहायक निबंधक, सहकारी संस्था, मालेगाव रविंद्र सावंत, सहायक निबंधक, सहकारी संस्था (प्रशासन) अधिन जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वाशिम जयंत सहारे, सहकार अधिकारी श्रेणी–१, वाशिम महेश कच्छवे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, वाशिम पाराशर सरकटे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, मंगरुळपीर गजानन फाटे, सहायक निबंधक, सहकारी संस्था, रिसोड राहुल ओईंबे, कार्यालय अधिक्षक, वाशिम पी. आर. वाडेकर, मुख्य लिपिक, वाशिम.

### कायम स्वरूपी ठोस कारवाईची गरज...

कर्ज बाजारीमुळे जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. सहकार विभागाने एकाच दिवशी आठ ठिकाणी छापे टाकून आठ पथकाद्वारे कारवाई केली. ही कारवाई अभिनंदनीय असून यामुळे काही प्रमाणात का होईना अवैध सावकारीवर वचक बसणार आहे. मात्र, अशाच प्रकारच्या ठोस स्वरूपाच्या कायम स्वरूपी कारवाई करून अशा अवैध सावकारावर कडक कारवाई करून त्यांना जेलमध्ये ठाकण्याची मागणी होत आहे. ठोस कारवाई प्रमाणेच हे प्रकरण मॅनेज न करता कायमस्वरूपी पुढे न्यावे व अवैध सावकारांना जिगरबाज अधिकाऱ्यांनी धडा शिकवावा अशी मागणी होत आहे.

## मंगरूळपीर न प स्थायी समिती व विषय समित्यांवर... भाजपा शिवसेना युतीचे सर्व सभापती अविरोध



•सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर•

येथील नगर परिषदेच्या स्थायी व विषय समित्यांच्या निवडणुकांमध्ये भाजपा-शिवसेना युती ने आपले वर्चस्व सिद्ध करत सर्व समित्यांच्या सभापतीपदावर वर्चस्व प्रस्थापित केले. अपेक्षेप्रमाणे सर्व स्थायी व विषय समित्यांच्या सभापतीपदी भाजपा-शिवसेना युतीचे नगरसेवक यांची ता २२ रोजी अविरोध निवड झाली आहे.या निवडणुकीत आ. शाम खोडे व भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांचे वर्चस्व दिसून आले आहे.

यावेळी येथील नगर परिषद कार्यालयात पिठासिन अधिकारी म्हणून उपविभागीय अधिकारी रवी काळे व सहाय्यक म्हणून नगर परिषदेचे मुख्याधिकारी सतीश शेवदा, नायब तहसीलदार रवि राठोड,पिठासीन सभापती नगराध्यक्ष अशोक परळीकर, उपाध्यक्ष अनिल गावंडे यांच्या उपस्थितीत विशेष सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला भाजपा-शिवसेना युतीचे सर्व नगरसेवक हजर होते. दुपारी १२ ते ३ या वेळेत इच्छुकांकडून नामनिर्देशन स्वीकारण्यात आले.यामध्ये सर्व विषय समित्यांच्या सभापती पदासाठी एकेकच अर्ज प्राप्त झाल्यामुळे सर्व समित्यांवरील सभापतींची निवड ही अविरोध करण्यात आली.यावेळी पाणीपुरवठा व जलनिसारण समिती सभापतीपदी प्रा.ॲड.सुधीर घोडचर, महिला व बालकल्याण सभापतीपदी लता पुरुषोत्तम चितलांगे, सार्वजनिक बांधकाम समिती सभापतीपदी शिवसेना शिंदे गटाच्या सपना गणेश बजाज तर शिक्षण समिती सभापतीपदी प्रा.विरेंद्रसिंह ठाकूर यांची निवड करण्यात आली, तसेच नगर परिषदेचे नवनियुक्त उपाध्यक्ष अनिल गावंडे यांची आरोग्य सभापती पदी यांची निवड करण्यात आली. यावेळी एकूण २१ व २ स्वीकृत सदस्य असलेल्या मंगरूळपीर नगरपालिकेत भाजपा शिवसेना युतीकडे भाजपाचे १२, राष्ट्रवादी अजितदादा गटाचे ६ कॉंग्रेस १ एम आय एम १ अपक्ष ३ एकूण २३ नगरसेवकांचे पक्षीय बलाबल असून सर्व सभापतींची निवड ही अविरोध झाली. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, नगरसेवक नंदलाल पवार, चंदूभाऊ परळीकर,भाजपा गटनेता गणेश खोडे, श्रीहरी इंगोले,यासह सर्व नगरसेवक उपस्थित होते.

## आज केनवड येथे पंचायतराज अभियानाचा तक्रार निवारण

### कार्यक्रमातून प्रशासकीय जनजागृती नव्हे तर राजकीय पुढाऱ्यांचा प्रचार

• प्रभाकर नाईकवाडे @ केनवड •

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत आज दिनांक २३ जानेवारी २०२६ रोजी पंचायत समिती रिसोड अंतर्गत केनवड जि. प. सर्कलमधील लाभार्थ्यांच्या विविध प्रलंबित समस्यांबाबत तक्रार निवारण मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे, हा मेळावा आज सकाळी १० वाजता विठ्ठल–रुख्मिणी मंदिर, केनवड येथे होत आहे, या मेळाव्यात घरकुल व सिंचन विहीर मंजूर असूनही हप्ते न मिळालेल्या लाभार्थ्यांच्या तक्रारी स्वीकारण्यात येणार आहेत, तसेच ईकेवासी प्रलंबित (प्रथम हप्ता) असलेल्या घरकुल लाभार्थ्यांनी आधार कार्ड व बँक पासबुक सोबत घेऊन उपस्थित राहावे, हि माहिती राजकीय पुढाऱ्याच्या बॅनर मधून समोर आली आहे परंतु प्रशासनाकडून अशी अधिकृत माहीती देण्यात आलेली नाही, उलट ही माहिती काही राजकीय पुढाऱ्यांच्या बॅनरमधून सोशल मीडियावरील व्हॉट्स?प ग्रुपवर प्रसारित करण्यात आल्याचे चित्र दिसून आले आहे,

या मेळाव्यात अतिक्रमणधारक लाभार्थ्यांच्या नियमानुकूल प्रकरणांचे परिपूर्ण प्रस्ताव ग्रामसेवकांनी सोबत आणावेत असेही स्पष्ट करण्यात आले आहे, मात्र आज होत असलेल्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज या अभीयान मेळाव्याची प्रशासनाच्या वतीने कोणतीही जनजागृती अथवा अधिकृत प्रसिद्धी करण्यात आलेली नाही ही बाब गंभीर ठरत आहे, ना दवंडी ना ग्रामपंचायत नोटीस ना ग्रामसभा ना कोणतीही लेखी सूचना अशीच स्थिती आज संपूर्ण केनवड जि. प. सर्कलमध्ये गावागावात दिसून आली आहे, विशेष म्हणजे जिल्हा परिषद निवडणुका जवळ येत असताना काही राजकीय पुढाऱ्यांनी आपापल्या बॅनरमधून या मेळाव्याची माहिती प्रसारित केल्याचे दिसून आले आहे, त्यामुळे हा तक्रार निवारण मेळावा लाभार्थ्यांसाठी कमी आणि निवडणूकपूर्व राजकीय फायद्यासाठी अधिक वापरला जात आहे का असा संशय नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे, जर हा मेळावा खरोखरच जनतेच्या प्रश्नांच्या निवारणासाठी आणि प्रशासनाच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आला असेल तर आजच्या मेळाव्याची अधिकृत प्रसिद्धी प्रशासनाने आधीच का केली नाही, की प्रशासनानेही राजकीय पुढाऱ्यांच्या बॅनरबाजीवरच अवलंबून राहणे स्वीकारले आहे असा थेट सवाल नागरिक उपस्थित करत आहेत, प्रशासनाच्या वतीने माहिती न मिळाल्याने लाभार्थी गैरहजर राहिल्यास तक्रारी येणारच नाहीत, तक्रारी नसतील तर निवारणाची आकडेवारीच कशी तयार होणार, अशी तीव्र भावना व्यक्त होत असून हा मेळावा खऱ्या अर्थाने तक्रार निवारणासाठी नसून केवळ कागदोपत्री पूर्ततेसाठीच राबवला जात आहे अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे, विशेष बाब म्हणजे या तक्रार निवारण मेळाव्यात नेमके कोणत्या तक्रारींचे निवारण होणार आहे तसेच लाभार्थ्यांनी कोणती कागदपत्रे सोबत आणायची आहेत ही अत्यावश्यक माहिती प्रशासनाच्या वतीने अधिकृतपणे जाहीर करण्यात आलेली नाही, ही संपूर्ण माहिती केवळ काही राजकीय पुढाऱ्यांच्या बॅनरमधूनच पुढे आली असून केनवड जि.प. सर्कलमधील एकाही गावात प्रशासनाकडून अधिकृत प्रसिद्धी देण्यात आलेली नाही ही बाब अधिकच गंभीर ठरत आहे.

**सीईओ साहेब, कार्यक्रम तुमचाष्ठ प्रचार प्रसार पुढाऱ्यांचा?**

मुख्यमंत्री समृद्धी पंचायतराज अभियानांतर्गत आयोजित तक्रार निवारण कार्यक्रम हा प्रशासनाचा अधिकृत उपक्रम असताना ना केनवड जिल्हा परिषद गावात ना दवंडीने ना नोटीसीने ना ग्रामसभेतून प्रचार करण्यात आला, उलट या कार्यक्रमाची माहिती राजकीय पुढाऱ्यांच्या बॅनरमधून व व्हॉट्स?प प्रचारातूनच लोकांपर्यंत पोहोचली, ना प्रशासनाची अधिकृत माहिती ना कागदपत्रांची यादी अशा परिस्थितीत हा कार्यक्रम खरोखर तक्रार निवारणासाठी आहे की राजकीय पुढाऱ्यांच्या फायद्यासाठी आहे असा थेट सवाल उपस्थित होत आहे, सीईओ साहेब कार्यक्रम प्रशासनाचा असताना प्रचार मात्र राजकीय पुढाऱ्यांचा हे चित्र कुणाच्या जबाबदारीत मोडते, या प्रकरणात संबंधित प्रशासनावर काय कार्यवाही होईल हे पाहणे तितकेच खरे ठरणार आहे.

## थोडक्यात

### 'आत्म्या'तून शेतकरी केंद्रित योजना प्रभावीपणे राबवा -जिल्हाधिकारी



•सिटी न्युज ब्युरो @ वाशीम•

जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आत्मा अंतर्गत राबविण्यात येणारे प्रशिक्षण, अभ्यास दौरे व विविध उपक्रम अत्यंत उपयुक्त ठरत आहेत. आधुनिक तंत्रज्ञान, नव्या शेती पद्धती व बाजाराभिमुख शेतीचा अवलंब करून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे ही काळाची गरज असून आत्मा मार्फत राबविण्यात येणारे उपक्रम शेतकऱ्यांना योग्य दिशा देणारे आहेत, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. आत्मा नियामक मंडळाची महत्त्वपूर्ण सभा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली (दि.२१) रोजी संपन्न झाली. यावेळी ते बोलत होते. बैठकीला कृषी उपसंचालक हिना शेख, महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक सागर सावरकर, कृषी विज्ञान केंद्र करडाचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. आर.एल. काळे, जिल्हा रेशीम विकास अधिकारी सुनील फडके,कृषी संशोधन केंद्राचे डॉ.भरत गीते, मुख्यमंत्री फेलो संकेत नरोटे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

## मेडशी - वाकळवाडी रस्त्यात भ्रष्टाचार !

### *आदिवासी बहुल गावात जाणाऱ्या एकमेव रस्त्याचे निकृष्ट दर्जाचे काम * कोट्यवधींच्या निधीचा चुराडा

• सिटी न्युज ब्युरो @ मेडशी •

मालेगाव तालुक्यातील मेडशीपासून अवघ्या तीन किलोमीटर अंतरावर असलेले वाकळवाडी हे शंभर टक्के आदिवासी बहुल गाव असून या गावात ये-जा करण्यासाठी मेडशी-वाकळवाडी हा एकमेव रस्ता आहे. चारही बाजूंनी नदीने वेढलेले, निसर्गरम्य पण अत्यंत दुर्गम असलेल्या या गावाचा संपर्क संपूर्णपणे या रस्त्यावर अवलंबून आहे. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाली होती.





गावकऱ्यांनी वारंवार पाठपुरावा केल्यानंतर अखेर येथे सुमारे दीड किलोमीटर लांबीचा व तब्बल चार कोटी रुपयांचा सिमेंट कॉंक्रीट रस्ता मंजूर करण्यात आला. मात्र प्रत्यक्षात सुरू असलेले काम पाहता हा निधी विकासासाठी नसून ठेकेदारांच्या खिशासाठीच मंजूर झाला की काय? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**ना खोलीकरण, ना सिमेंट – फक्त माती, खडे व दगड**

रस्त्याच्या कामामध्ये आवश्यक ते खोलीकरण न करता, सिमेंटचा वापर न करता केवळ माती, खडे व दगडांचा थर टाकून काम सुरू असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. सिमेंट कॉंक्रीट रस्ता असल्याचा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात रस्त्यावर सिमेंटचा मागमूसही नाही. परिणामी काही दिवसांतच रस्ता उखडू लागला असून दुचाकी, चारचाकी वाहनचालकांना अक्षरशः मरणयातना सहन करत प्रवास करावा लागत आहे.

**आदिवासी गाव असल्याने दुर्लक्ष**

वाकळवाडी हे आदिवासी बहुल गाव असल्याने या रस्त्याच्या कामाकडे ना कोणत्याही लोकप्रतिनिधीचे लक्ष आहे, ना वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट. याचाच फायदा घेत संबंधित ठेकेदाराने अत्यंत निकृष्ट दर्जाचे व बोगस काम सुरू केल्याचा आरोप गावकऱ्यांनी केला आहे. कोट्यवधी रुपये खर्चून एवढ्या हलक्या प्रतीचा रस्ता जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात पहिल्यांदाच पाहायला मिळत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

### भ्रष्टाचाराचा संशय; चौकशीची मागणी

या कामामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे.

संबंधित विभागाने तातडीने या कामाची गुणवत्ता तपासणी करावी, थर्ड पार्टी चौकशी करावी व दोषी ठेकेदारावर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे. तसेच संबंधित ठेकेदाराचा परवाना कायमस्वरूपी रद्द करण्यात यावा, अशीही मागणी पुढे आली आहे.

## घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांसाठी 'स्पर्श प्रणाली' ठरली डोकेदुखी

• सिटी न्युज ब्युरो @ रिसोड •

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण आणि रमाई आवास योजनेसह विविध घरकुल योजनांच्या लाभार्थ्यांसाठी घरकुलाचे हप्ते त्वरित वितरित व्हावेत या उद्देशाने शासनाने सुरू केलेले स्पर्श प्रणाली आत्ता अधिकारी कर्मचारी आणि लाभार्थी दोघांसाठीही मोठी डोकेदुखी ठरत आहे. या पद्वारे ४८ तासांत लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा होतील, अशी घोषणा शासनाने केली होती; मात्र प्रत्यक्षात परिस्थिती पूर्णपणे वेगळी आहे.

पैसे सोडले पण जमा होईना आणखीन किती दिवसाचा विलंब अनेक ठिकाणी संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी लाभार्थ्यांचे हप्ते स्पर्श प्रणाली पद्वारे सोडून १५ ते २० दिवस झाले तरी अद्याप एकाही लाभार्थ्यांच्या बँक खात्यात पैसे जमा झालेले नाहीत. त्यामुळे लाभार्थी सध्या आर्थिक संकटात सापडलेले असून त्यांना नाहक



मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.

**काम पूर्ण होऊनही हप्ता नाही..**

विशेषतः ज्या लाभाच्यांचे घरकुल बांधकाम पूर्ण झालेले आहे. किंवा जे बांधकामाच्या अंतिम टप्प्यात आहेत, त्यांना दुसरा किंवा तिसरा हप्ता वेळेवर मिळत नसल्यामुळे त्यांचे काम थांबलेले आहे. वेळेवर हप्ता न मिळाल्याने लाभार्थी अडचणीत आले आहेत.

**लाभार्थ्यांची मागणी, जुनीच पद्धत सुरू करा..**

स्पर्श प्रणाली पमुळे निर्माण झालेल्या गोंधळामुळे आणि विलंबाने संतप्त झालेल्या लाभार्थ्यांनी आपली तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. या लाभार्थ्याकडून अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# खुल्या बाजारातील सोयाबीनने गाठले शासकीय दर !

## नेमका फायदा कोणाचा? शासकीय खरेदी केंद्राकडे पाठ

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोला :** आधी शेतकऱ्यांना मातीमोल भावात आणि शासकीय हमीभाव केंद्रावर अनेक अडचणींचा व नियमांचा ससेमिरा सहन करीत सोयाबीन विकावे लागले. आता मात्र खुल्या बाजारातच सोयाबीनचे दर शासकीय दरापर्यंत पोहोचल्याने शेतकऱ्यांची निराशा झाली आहे. आता वाढलेल्या दराचा नेमका फायदा कोणाला, कोणासाठी वाढविले हे दर असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. यामुळे सोयाबीनच विकायचे बाकी असलेल्या शेतकऱ्यांनी शासकीय खरेदी केंद्राकडे पाठ फिरविली आहे.

अकोला कृषी उत्पन्न बाजार समितीत गुरूवार, २२ जानेवारीला सोयाबीनचे दर सरासरी ५ हजार तर कमाल दर ५ हजार २२९ रूपये प्रतिक्विंटलवर पोहोचले आहेत. दुसरीकडे शासकीय हमीभाव ५ हजार ३२८ रूपये प्रतिक्विंटल इतका आहे. मात्र आता शेतकऱ्यांकडे सोयाबीनच शिल्लक नसल्याने हा वाढलेला



भाव कोणासाठी असा प्रश्न निर्माण झाला आहे. काही राज्यात अल्पभूधारक शेतकरी वर्ग मोठा आहे. त्यांचे संपूर्ण बजेट हा पिकांवरच अवलंबून असल्याने ते पीक काढणीनंतरच लगेच बाजारात घेऊन जातात. मात्र नेमके तेव्हाच भाव पडलेले असतात. त्यामुळे त्यांना नाईलाजास्तव मिळेल त्या भावात आपला शेतमाल विकावा लागतो. विशेष म्हणजे शासनाला माहिती असूनही शासकीय हमीभाव केंद्र उशिराने सुरू करण्यात येतात. यामुळे शेतकऱ्यांना मुकाटपणे भावात नुकसान सहन करावे लागते.

गेल्या तीन वर्षापासून चार हजार ते साडेचार हजार रुपये प्रतिक्विटल याच दरावर रेंगाळणाऱ्या सोयाबीनच्या दरात आता सुधारणा झाली असून, शासकीय हमीभावाच्या बरोबरीला सध्या सोयाबीनचे दर पोहोचले आहेत. परिणामी शासकीय दराने खरेदी करणारी केंद्रे ओस पडली असून, खुल्या बाजारात सोयाबीनचे भाव वाढले असले तरी बहुतांश शेतकऱ्यांकडील सोयाबीन यापूर्वीच विकले गेल्याने या दराचा लाभ शेतकऱ्यांना अपवादानेच होणार आहे. गेल्या दोन्हीही हंगामात सोयाबीनचे दर कोसळलेलेच होते. यावर्षीही सोयाबीन बाजारात आल्यानंतर दरात फारशी सुधारणा झालीच नव्हती. त्यामुळे शेतकऱ्यांना सातत्याने फटका बसणारे हे तिसरे वर्ष आहे. मात्र, गेल्या तीन वर्षांत पहिल्यांदाच सोयाबीनच्या दरात सुधारणा झाली आहे. सध्या खासगी बाजारात सोयाबीनचा दर ५ हजार३०० रुपये प्रतिक्विटल आहे. पंधरा दिवसांपासून सोयाबीनच्या दरात वाढ होण्यास सुरुवात झाली. सोयाबीनची शासकीय खरेदी १२ फेब्रुवारीपर्यंत चालणार असली तरी बाजारात सोयाबीनच्या दरात वाढ झाल्याने शेतकरी आता खुल्या शासकीय खरेदी केंद्राकडे पाठ फिरविली आहे.



### कापसाच्या दरातही झाली वाढ!

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असतानाच ग्रामीण भागातील कापूस उत्पादकांना चांगला दर मिळताना दिसतो आहे. कापसाला दर प्रतिक्विटल ८,४०० रुपयांचा खासगी जिनिंग व्यावसायिकांकडून मिळत असून, त्यामागे बाजारपेठेत सरकीचे दर वधारल्याचे कारण सांगितले जात आहे. सरकीला ४ हजार२०० रुपयांपर्यंतचा दर मिळत असून, गतवर्षी सरकीचा दर ३ हजार १०० रुपयांपर्यंतचा होता. सरकी तेलाच्या डब्याचाही दर १ हजार९८० रुपये होता. आता यंदाचा सरकी तेलाचा दर किलोमागे १३० रुपये झाला आहे. यंदा कापसाचे उत्पादनच मुळात घटले, असून, अतिवृष्टीमुळे उतारा कमालीचा घटला आहे.

# मराठी भाषा विभागातर्फे 'बोलींचा जागर'

## भाषाविज्ञानात संशोधन आवश्यक – कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर



प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोला :** भाषेच्या संशोधन, संवर्धनाच्या अनुषंगाने साहित्याइतकेच भाषाविज्ञानही महत्वाचे आहे. हे लक्षात घेऊन रिद्धपूर येथील मराठी भाषा विद्यापीठाकडून नव्या अभ्यासक्रमांची रचना करण्यात येत आहे, असे प्रतिपादन मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.अविनाश आवलगावकर यांनी आज येथे केले. मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय, मराठी भाषा विद्यापीठातर्फे श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालयात आयोजित 'बोलींचा जागर' कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून ते बोलत होते. राज्याचे भाषा संचालक अरुण गीते, उपसंचालक संतोष गोसावी, विद्यापीठाचे विशेष कार्य अधिकारी राम राठोड, भारतीय सेवा सदनचे अध्यक्ष दिलीपराज गोयनका, प्राचार्य डॉ. चारुशीला रुमाले, जिल्हा माहिती अधिकारी हर्षवर्धन पवार, डॉ.रामदास चवरे, प्रा. भगवान डोहळे, प्रकाश चव्हाण, समन्वयक डॉ.स्वप्नील इंगोले आदी यावेळी उपस्थित होते. कुलगुरू डॉ. आवलगावकर म्हणाले की, भारतीय ज्ञानपरंपरा समृद्ध असून, तिच्याकडे केवळ आध्यात्मिक भूमिकेतून न पाहता वैज्ञानिक दृष्टीतून पाहिले पाहिजे. शास्त्रीय दृष्टीतून पाहिल्यास आपल्या ज्ञानपरंपरेच्या समृद्धी व सामर्थ्याची जाणीव होते. समाजात भाषा टिकण्यासाठी बोली टिकली पाहिजे. त्यासाठी व्यवहारात स्वभाषेचा वापर आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येकाने आग्रही राहिले पाहिजे. पारधी आणि कलाली या मराठी बोलीभाषांबाबत कलाली बोली भाषातज्ज्ञ डॉ.रामदास चवरे, प्रा. भगवान डोहळे, तसेच पारधी बोली भाषातज्ज्ञ प्रकाश चव्हाण यांची व्याख्याने झाली. मराठी ही विविध बोलींनी समृद्ध असून, तिचे संवर्धन आवश्यक असल्याचे प्रतिपादन विविध मान्यवरांनी यावेळी केले. कार्यक्रमाचा प्रारंभ ग्रंथदिंडीने झाला. यावेळी विविध लोककलांचे सादरीकरणही करण्यात आले.

## गाडीला जागा नसल्याने आमदार साजीद खान पठाण यांचा संताप



**अकोला :** पालकमंत्री आकाश फुंडकर आज जिल्हा नियोजन समितीच्या सभे करीता अकोला जिल्हाधिकारी कार्यलयात आले होते. नियोजन भवन च्या पोर्च मध्ये पालकमंत्र्यांची गाडी लागल्याने आमदार साजीद खान पठाण यांच्या गाडीला जाण्यासाठी रस्ता नसल्याने आमदार साजीद खान पठाण यांनी केला रोष व्यक्त केला. साजीद खान पठाण यावेळी चांगलेच संतापले होते.

## जुन्या शहरात पुन्हा विजेचा लपंडाव

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोला :** जुन्या शहरात पुन्हा एकदा वीजेचा गोंधळ सुरू झाला असल्याचे दिसते. माहिती नुसार सोमवार हा देखभालीचा दिवस असतो. परंतु आता अन्य दिवशी देखील देखभालीचे काम करण्यात येत असल्याचे दिसते. गुरुवार जवळपास चार तास आणि यापुर्वी मंगळवारी एक तास वीजपुरवठा बंद ठेवण्यात आला. शुक्रवारी सकाळी देखील वीजेचे जाणे- येणे सुरू होते. पुर्वी देखभालीच्या कामासाठी वीज पुरवठा बंद ठेवण्यात येणार असल्यास वीज ग्राहकांना मोबाईल वर तशी सूचना देण्यात येत असे. परंतु आता ग्राहकांना कुठलीही पुर्व सूचना देण्यात येत नाही. ग्राहकांनी मंगळवारी १९१२ या टोलफ्री क्रमांकावर ऑनलाईन तक्रार नोंदवण्यासाठी फोन केला असता. आपण चूकीचा नंबर डायल केला आहे, कृपया नंबर तपासून बघा अशी कॅसेट वाजत होती. त्यामुळे ग्राहकांना विनाकारण त्रास सहन करावा लागला. वीज बीलाचा भरणा करण्यासाठी तकाजा लावणाऱ्या महावितरण कंपनीने, आपल्या कार्य पद्धतीत बदल करणे आवश्यक असल्याचे जुन्या शहरातील वीज ग्राहकांचे म्हणणे आहे.

# समाजसेवकांनी इंटरनेटवर शोध घेऊन रूग्णाला नातेवाईकांच्या स्वाधीन केले

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोला :** पश्चिम बंगालच्या मिदनापूर जिल्ह्यातील रूग्णाला नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात समाजसेवकांनी महत्त्वाची भूमिका बजावली. इंटरनेट द्वारे त्याच्या नातेवाईकां पर्यंत पोहचले. पोलिसांनी देखील सहाय्य केले. रेल्वे अपघातातील रूग्ण वार्ड क्रमांक २६ मध्ये दाखल होता.

समाजसेवक अमोल शेंडे व अमित मिटकरी यांनी येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल रुग्णाकडून माहिती घेतली. इंटरनेटच्या माध्यमातून रुग्णाच्या जिल्ह्यातील



पोलिस स्टेशनच्या मदतीने रुग्णाच्या नातेवाईकांचा शोध घेतला. किशोरी सुशांकू सहा याला नेण्यासाठी त्याचा भाऊ गणेश साहा आणि नातेवाईक अकोला येथे आले होते. डॉ. संजय सोनुने, वैद्यकीय अधीक्षक डॉ. शामकुमार सिरसाम, उप अधिष्ठाता डॉ. नैताम, मेट्रन ग्रेसी मैडम, समाजसेवा अधीक्षक अमोल शेंडे, वार्ड क्रमांक २६ च्या इन्चार्ज चिमनकर सिस्टर, डॉ. सिध्दार्थ सिंग, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता अमित मिटकरी, कक्षसेवक अभिलास तायडे व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयातील कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# एसटीच्या यूपीआय पेमेंटेला प्रवाशांचा चांगला प्रतिसाद, विभागात एकूण 8 कोटी जमा

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोला :** राज्य परिवहन महामंडळाच्या बससेवेमध्ये डिजिटल व्यवहारांना मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. फोन पे गुगल पे व तत्सम यूपीआय पेमेंटच्या माध्यमातून तिकीट काढण्याच्या प्रमाणात सातत्याने वाढ होत असल्याचे चित्र समोर आले आहे. मागील वर्षी २०२५ मध्ये अकोला मध्यवर्ती बस स्थानक आगाराला दर महिन्याला लाखो रुपयाची तिकीट विक्री झाल्याची माहिती आगार व्यवस्थापकाकडून देण्यात आली आहे.

शहरातील मध्यवर्ती बस स्थानकावरून दररोज महाराष्ट्राच्या विविध विविध शहराकरिता बसेस धावतात या बसेस मध्ये मागील काही



महिन्यापासून रोख तिकिटेतल्या तुलनेत यूपीआय मार्फत विक्रीला प्रवाशांकडून भरघोस प्रतिसाद मिळत आहे. प्राप्त आकडेवारी नुसार सप्टेंबर २०२५ महिन्यात एकूण सुमारे ४९.७९ लाखांहून अधिक यूपीआय द्वारे तिकीट व्यवहार झाले आहे. ऑक्टोंबर महिन्यात ही संख्या आणखी वाढत ७७.३२ लाख रुपयांपर्यंत पोहोचली आहे. डिसेंबर २०२५ मध्येही हीच वाढती प्रवृत्ती कायम राहिली असून एकूण सुमारे ६२.५९ लाखाहून अधिक यूपीआय द्वारे तिकीट व्यवहार झाले असून त्यातून ८ कोटी रुपये महसूल विभागात जमा झाला आहे.

# हिवरा बु.येथे वीर हनुमान कबड्डी संघाच्या वतीने कबड्डी स्पर्धा



प्रतिनिधी २३ जानेवारी

**खामगाव :** तालुक्यातील हिवरा बु.येथे हिंदूहृदय सम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्म शताब्दी वर्षानिमित्त कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. कबड्डी स्पर्धेचे उद्घाटन हिंदू सेवक ॲड. अमोल अंधारे यांच्या हस्ते झाले. शिवसेना तालुका प्रमुख राजेंद्र बघे, गौरव राहणे, दत्ता कवळे, सागर राहणे, वैभव काळे, सागर घोराडे, मनोहर आळशी, सोपान पागृत, अमोल दांदळे, हरिओम आळशी, शुभम शिंगोटे, विठ्ठल राहणे, श्याम सोनवणे, ज्ञानेश्वर राहणे, विशाल खंडारे, सोपान कवळे, गौरव आखरे, वैभव करांगळे, सुपेश राहणे, प्रसाद कवळे वैभव हागे, शंकर कवळे, स्वरूप कवळे आदी सह महिला व ग्रामस्थ उपस्थित होते.

# महापौर निवडणुकीच्या कार्यक्रमाच्या घोषणेची प्रतीक्षा

## ♦ भाजप विरोधक एकत्र राहणार काय, जनतेला प्रश्न

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोला :** महापालिकेत कोणाची सत्ता होणार, या विषयावर अकोलेकरांमध्ये कमालीची उत्सुकता आहे. इतकेच नाही तर प्रत्येक व्यक्ती या विषयावर चर्चा करताना दिसतो. भाजप कि महाविकास आघाडी असा प्रश्न अकोलेकरांना पडला आहे.जनतेने कोणाला नाकारले आणि कोणाची सत्ता होणार यावर मंथन होताना दिसत आहे.

भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी महाआघाडीच्या दोन आमदारांनी तगडी फिल्डिंग लावली आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीत एमआयएम, काँग्रेस, शरद पवार गट आणि अजित पवार गटाच्या नेत्यांची संयुक्त बैठक पार पडली. विशेष म्हणजे, या बैठकीला उद्धव ठाकरे गटाची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरली आहे. फोडाफोडीच्या भीतीने आज रात्री अनेक नगरसेवक गुपित स्थळी किंवा हॉटेलवर रवाना होण्याची शक्यता आहे.महापालिकेत सत्ता कोणाची येणार यासह महापौर पदासाठी कोणाची वर्णी लागणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सध्या रिंगणात ही नावे आघाडीवर आहेत. यात भाजपच्या वतीने रश्मी अवचार, शारदा खेडकर यांच्या नावाची चर्चा आहे. तर उध्दव ठाकरे यांच्या गटाकडून सुरेखा मंगेश काळे यांच्या नावाची चर्चा आहे. तर वंचित कडून जयश्री बहादूरकर यांच्या नावाची चर्चा रंगली होती. केवळ महापौरच नाही, तर उपमहापौर, स्थायी समिती सभापती, सभागृह नेते आणि विषय समिती सभापती पदांसाठीही जोरदार लॉबिंग सुरू आहे. अकोल्याच्या राजकीय गोटात सध्या एका नगरसेवकाची किंमत १ कोटी रुपयांपर्यंत गेल्याची चर्चा रंगली आहे. घोडेबाजार तेजीत असल्याने नेत्यांनी आपल्या नगरसेवकांना सुरक्षित ठेवण्यासाठी फिल्डिंग लावली आहे. शुक्रवारी सकाळी ११ वाजता होणाऱ्या पत्रकार परिषदेत प्रकाश आंबेडकर कोणती घोषणा करतात आणि भाजप आपली ४५ ची जादू कशी सिद्ध करते, यावर अकोल्याचा पुढचा 'कारभारी' कोण हे स्पष्ट होईल.

# वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांमुळे शेतकरी त्रस्त

## ♦ नरनाळा उत्सवावर बहिष्कार टाकणार

प्रतिनिधी २३ जानेवारी

**अकोट:** जिल्ह्यात वन्यप्राण्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे शेतकरी, शेतमजूर तसेच आदिवासी भयभीत झाले आहे. शेती, जनावरे व मानवी जीवनाला गंभीर धोका निर्माण झाला आहे. मात्र या गंभीर प्रश्नाकडे वनविभाग व प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले.

शेतकरी संघटनेचे विदर्भ अध्यक्ष लक्ष्मीकांत कौठकर यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी व आदिवासी महिलांनी जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन वन्यप्राण्यांमुळे होत असलेल्या नुकसानीची वस्तुस्थिती



प्रशासनासमोर मांडली. जिल्ह्यातील ग्रामीण भाग व सातपुडा पायथ्यालगतच्या परिसरात रानडुक्कर, नीलगाय, हरण, वानर व जंगली कुत्रे यांचा सुळसुळाट झाला असून मोठ्या प्रमाणावर शेती उद्ध्वस्त होत आहे. रात्री शेतात जाणे अशक्य झाले असून अनेक गावांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. २०२४–२५ मध्ये जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर पिकांचे नुकसान झाले असतानाही नुकसान भरपाई अत्यल्प व विलंबाने मिळत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. वन्यप्राणी थेट मानवी वस्तीत शिरू लागल्याने महिला व लहान मुलांमध्ये दहशत निर्माण झाली असून, जीवितहानीची भीती व्यक्त करण्यात आली आहे.वन्यप्राण्यांचा प्रश्न गंभीर असताना प्रशासन केवळ महोत्सव साजरे करण्यात व्यस्त असल्याचा आरोप केला. नरनाळा महोत्सवावर बहिष्कार टाकण्याचा इशारा शेतकरी संघटनेने दिला आहे. मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशाराही प्रशासनाला दिला. यावेळी तालुका अध्यक्ष निलेश नेमाडे, अकोट तालुका अध्यक्ष दिनेश गिन्हे, रामकिशोर थुटे, जाफर खा अहमद खा, सुरेश सोनोने, मकसुद मुल्ला जी, मोहन खिरोडकार, अफजल भास्कर, नदीमोद्दिन करीमोद्दीन, गोपाल निमकर्डे आदी उपस्थित होते.या प्रकरणी जिल्हाधिकारी वर्षा मीना व प्रशासन कोणती ठोस कारवाई करते, याकडे लक्ष लागले आहे.

# खामगावात लाखोंची रोकड घेऊन चोरटे पसार, व्यापाऱ्यांत दहशत

प्रतिनिधी २३ जानेवारी

**खामगाव :** शहरातील अत्यंत वर्दळीचा आणि व्यापारीदृष्ट्या महत्त्वाचा समजला जाणारा तलाव रोड परिसरात अज्ञात चोरट्यांनी काळोखाचा फायदा घेत दोन नामांकितव्यावसायिक आस्थापनांमधील लाखोंची रोकड लंपास केल्याची खळबळजनक घटना २२ जानेवारी रोजी उघडकीस आली. या घटनेमुळे शहरातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, तलाव रोडवरील पार्ले शिवांगी बेकर्स आणि ओम शंकर अग्रो मिल या दोन



व्यावसायिक आस्थापनांना चोरट्यांनी लक्ष्य केले.मध्यरात्रीच्या सुमारास अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने चोरट्यांनी या आस्थापनांचे कुलूप तोडून आत प्रवेश करत असून ठेवलेली मोठी रक्कम रोकड चोरून नेली. कार्यालयात ठेकेदारांनी मोठी रक्कम ठेवली होती.नेहमीप्रमाणे व्यवसाय सुरू करण्यासाठी कर्मचारी व मालक घटनास्थळी आले असता, कार्यालयांचे कुलूप तुटलेले आणि आतील साहित्य अस्ताव्यस्त अवस्थेत पडलेले दिसून आले. कपाटे उघडी, कागदपत्रे फेकलेली आणि रोकड नसल्याचे लक्षात येताच चोरी झाल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर तातडीने शिवाजीनगर पोलिस ठाण्याला घटनेची माहिती देण्यात आली.

माहिती मिळताच शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी पंचनामा करून संपूर्ण परिसराची बारकाईने पाहणी केली. फॉरेन्सिक पथकाच्या मदतीने तांत्रिक पुरावे गोळा करण्यात येत असून, सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे चोरट्यांचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत, तसेच परिसरातील इतर दुकाने, इमारती आणि रस्त्यांवरील कॅमेऱ्यांचे फुटेजही तपासले जात आहेत. याआधी झालेल्या चोरीच्या घटनांशी या घटनेचा काही संबंध आहे का, याचाही तपास पोलिस करत आहेत. या धाडसी चोरीमुळे तलाव रोड परिसरातील व्यापारी वर्गात प्रचंड भीतीचे आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले.


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012 /49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK